**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

**पृ.शी./मु.शी. :** तोंडी उत्तरे.

**भेसळयुक्त खाद्य तेलाची विक्री होत असल्याबाबत**

**(१) * ४२२४१ श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) तेल्हारा (जि.अकोला) येथील किराणा दुकानातून मोठया प्रमाणात भेसळयुक्त खाद्य तेलाची विक्री होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेल्हारा शहरातील बस स्थानक, जिजाऊ उद्यान, जुने शहर, संत तुकाराम चौक, अग्रसेन टॉवर चौक, माळेगाव नाका तसेच दुय्यम निबंधक कार्यालय येथे हातगाडयांवर व हॉटेलमध्ये भेसळयुक्त तेलाचा वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन त्यानुषंगाने अन्न व औषधे प्रशासनाकडून कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) हे खरे नाही.

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

## जालना, कोल्हापूर तसेच मुंबईत शिधावाटप केंद्रावरील धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(२) * ३९९६२ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयात अंत्योदय, अन्नसुरक्षा योजनेंतर्गत पात्र शिधापत्रिका धारकांना धान्य मिळत नसून शिधावाटप केंद्रावरील या धान्याचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोल्हापूर जिल्हयातील ३ लाख १६ हजार १९७ शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरे वसाहत (मुंबई) येथे एका गोदामावर छापा टाकून अवैधरित्या साठवलेला ३५ हजार किलो तांदूळ व ४५ हजार किलो गव्हाचा साठा माहे डिसेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान हस्तगत केला असून शिधावाटप केंद्रांमार्फत सदर धान्यसाठा अधिक दराने विकून धान्याचा काळाबाजार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त घटनांमध्ये पात्र रेशनकार्ड धारकांना धान्य पुरवठा होण्याबाबत तसेच धान्याचा काळाबाजार करणाऱ्या दुकानदारांवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या शिधावाटप कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९९६२.....

**श्री. छगन भुजबळ.....**

(३) सहकार भांडार, युनिट क्र. २, आरे कोलनी, गोरेगांव पूर्व येथून अनधिकृतपणे साठा केलेला ३६,६५० किलो तांदुळ व ४५,००० किलो गहू पोलीसांनी जप्त केला आहे. सदर प्रकरणी संबंधितांवर आरे पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.६९/२०२१, दि.१८.१२.२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी पोलिसांमार्फत तपास सुरु आहे.

(४) पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र तसेच पोलिसांकडून चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९९६२.....

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, जालना जिल्हयातील अंत्योदय अन्न सुरक्षा योजनेच्या अनुषंगाने सदर प्रश्न विचारलेला आहे. परंतु आरे वसाहत, मुंबई येथील एका गोदामावर डिसेंबर, २०२१ मध्ये छापा टाकण्यात आला. तेथून सुमारे ३५ हजार किलो तांदुळ व सुमारे ४५ हजार किलो गव्हाचा अवैध साठा हस्तगत करण्यात आला. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, सदर प्रकरणी संबंधितांवर आरे पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ६९/२०२१, दिनांक १८.१२.२०२१ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, या घटनेचा कार्यकाल अतिशय महत्त्वाचा आहे. आपणा सर्वजणांना ज्ञात आहे की, कोरोना काळात सामान्य आणि गरिब कुटुंबातील लोकांची स्थिती अतिशय हलाखीची होती. दरम्यानच्या काळात केंद्र सरकारमार्फत अंत्योदय योजनेंतर्गत सर्वांना मोफत अन्नधान्य वितरण करण्याची व्यवस्था करण्यात आली. या काळात अशा प्रकारची अन्नधान्याची चोरी होत असल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे. माझा प्रश्न असा आहे की, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये नमूद केलेला गुन्हा क्रमांक ६९/२०२१ हा कोणत्या कलमाखाली नोंदविण्यात आला आहे ? तसेच कोरोनाच्या काळात हा प्रकार निदर्शनास आला असल्यामुळे त्याची व्याप्ती आणि गांभीर्य अधिक वाढते. यामध्ये अधिकाऱ्यांसह अन्य काही लोक सहभागी असू शकतात. त्यामुळे यामध्ये संघटित गुन्हेगारी घडली आहे किंवा कसे हा माझा प्रश्न आहे. संघटित गुन्हेगारी घडली असल्यास संबंधितांवर संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमान्वये कारवाई करणार का ?

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून ९ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणातील ट्रक जप्त करण्यात आली असून गाडी मालकावर देखील कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी सदर प्रकरणाचा तपास करुन दोषींविरोधात आरोपपत्र दाखल केले आहे. त्याची प्रत देखील मी आपणास देऊ शकतो... (अडथळा...) संघटित गुन्हेगारी... हे एकमेव प्रकरण आढळून आले आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९९६२.....

श्री.छगन भुजबळ.....

इतर कुठेही अन्नधान्य मिळाले नसल्याबाबत तक्रार नाही. या प्रकरणातील दोषींविरोधात Essential Commodities Act च्या कलम ३, ७, ८ आणि PDS (Control) Order 1966 अंतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

श्री.अशोक पवार : अध्यक्ष महोदय, एकटया जालना जिल्हयातील आकडेवारी पाहिली तरीही ती खूप मोठी असल्याचे दिसून येत आहे. एका जिल्हयामध्ये एवढया मोठया प्रमाणात तांदुळ, गहू यांचा अवैध साठा आढळून येत असेल तर महाराष्ट्र राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये देखील असेच प्रकार घडत आहेत का, असा प्रश्न पडतो. सरकार अनेक गोष्टींमध्ये सातत्याने नवनवीन सुधारणा करीत असते. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, लाभार्थ्याला अन्नधान्य देण्याऐवजी त्याची किंमत थेट खात्यावर ट्रान्सफर करण्याबाबत सरकार काही प्रयोग करणार आहे का ?

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९९६२...

ॲड अशोक पवार...

उदाहरणार्थ एखादा तालुका घ्या किंवा एखादा जिल्हा घ्या. यासाठी सरकार काही वेगळे धोरण आणणार आहे काय, असा माझा प्रश्न आहे. त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, जालना आणि कोल्हापूर जिल्ह्यातील प्रश्न आहेत. एकाच प्रश्नामध्ये जालना, कोल्हापूर आणि मुंबईतील आरे कॉलनी आहे. ज्यांचे उत्पन्न १ लाखापर्यंत आहे त्यांना आपण केसरी कार्ड दिलेली आहेत. परंतु ग्रामीण भागासाठी ३९ हजार आणि ४४ हजार रुपये उत्पन्नाच्या बाबतीत जे प्राधान्य ठरविलेले आहे त्यांना आपण २ रुपये आणि ३ रुपये किलोने अन्नधान्य देतो. सन्माननीय सदस्य जी तक्रार सांगत आहेत, त्याचा अर्थ असा आहे की, ज्यांना अजिबात मिळत नव्हते. जे अप्राधान्य... ज्यांना प्राधान्य क्रमाने मिळत नव्हते. परंतु ज्यांचे उत्पन्न १ लाखापेक्षा कमी आहे आणि ज्यांच्याकडे कार्ड आहे अशा लोकांसाठी महाराष्ट्र शासनाने ४ महिन्यांसाठी अन्नधान्य विकत घेऊन त्यांना ८ रुपये किलो गहू आणि १२ रुपये किलो तांदुळ या दराने त्यांना फक्त ४ महिन्यांकरिता हे धान्य वाटप केले. त्यानंतर ते धान्य वाटप बंद केले. पण ज्यांचा प्राधान्य क्रमांक आहे त्या सर्वांना आपण धान्य वाटप करतो.

श्री. प्रकाश भारसाकळे : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न असा आहे की, या यंत्रणेमध्ये फार मोठा भ्रष्टाचार आहे. मंत्री महोदय आपल्याला जरी सांगत असले तरी परिस्थिती वेगळी आहे. ज्या अर्थी धाडी फक्त हप्ता वसुलीकरिता टाकल्या जातात की कारवाईसाठी टाकल्या जातात याचे उत्तर आले आहे. तेलाच्या बाबतीत अशी परिस्थिती आहे की, त्याची कोणी पाहणीच करीत नाही. फक्त हप्ता वसुली आणि धाडी टाकण्याचे काम केले जाते. त्यामुळे मंत्री महोदय याबाबत सविस्तर उत्तर देतील काय हा माझा प्रश्न आहे.

ता.प्र.क्र.३९९६२...

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी ३-४ जिल्ह्यासंबंधी प्रश्न उपस्थित झाला आहे. परंतु सन्माननीय सदस्यांना कोणत्या जिल्ह्याबद्दल प्रश्न विचारायचा आहे ते मला समजले नाही. कृपया जर त्यांनी समजून सांगितले तर मी उत्तर देऊ शकेल.

श्री. हरीश पिंपळे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश भारसाकळे यांचा अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यासंबंधीचा प्रश्न आहे. त्यामुळे आपण अकोला जिल्ह्याची माहिती द्यावी, अशी आपणास विनंती आहे.

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न हा पहिल्या क्रमांकाच्या तारांकित प्रश्नासंबंधी आहे. आता दुसऱ्याा प्रश्नावर चर्चा सुरू आहे. तो प्रश्न व्यपगत झाला.

श्री अबू आजमी : अध्यक्ष महोदय, मैं सम्माननीय मंत्री जी से निवेदन करना चाहता हूं कि मेरे विधानसभा क्षेत्र में राशन का एक ही कार्यालय है. जहां अणुशक्तिनगर और मानखुर्द शिवाजीनगर के लोग आते है वहां पर बहुत ज्यादा आबादी है, गरीब लोगों की आबादी है. इसके कारण राशन के कार्यालय में बहुत भीड़ रहती है. मेरा प्रश्न यह है कि वहां पर राशन का एक और कार्यालय खोला जाए.

अध्यक्ष महोदय, मेरा दूसरा प्रश्न यह है कि इसी तरह की हालत कुर्ला में है. चांदिवली और कुर्ला में बहुत दूरी है. चांदिवली में राशन का एक भी कार्यालय नहीं है. वहां के लोगों को कुर्ला में आना पड़ता है. इस बारे में मैंने आपसे पहले भी विनती की थी. मेरा निवेदन है कि आज आप कह दीजिए कि आप दोनों जगहों पर राशन का कार्यालय खोलेंगे, ताकि हम लोग खुशी मनाएं.

ता.प्र.क्र.३९९६२...

श्री छगन भुजबल : अध्यक्ष महोदय, अगर इनको खुशी होती है, तो मैं कहना चाहता हूं कि राशन का कार्यालय बहुत नजदीक होना चाहिए. इस बारे में आप मुझसे मिले है. उसके बाद मैंने बैठक ली और कह भी दिया है. उसके बाद राशन का कार्यालय कहां पर बनाना है, कैसे बनाना है, इसके बारे में देख रहे है.

**उपाध्यक्ष :** माझ्या माहितीप्रमाणे हा प्रश्न जालना आणि कोल्हापूर जिल्ह्यासंबंधी आहे.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, यामध्ये माझ्या मतदार संघातील आरे कॉलनीचा संबंध आहे. ज्या ठिकाणी धाड टाकली होती त्या गोरेगांवमधील आरे कॉलनीमध्ये धान्य साठविले जाते. आरे कॉलनीमध्ये बंगले आहेत.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९९३२.....

श्री. रविंद्र वायकर...

बंगल्यांचे गोडाऊन केले जाते. तरी देखील आरे कॉलनीतील सीओंना ती बाब कळत नाही. अशा पद्धतीने अनेक घरांची गोडाऊन केली आहेत. याच्या तक्रारी देखील झालेल्या आहेत. हे गोडाऊन कोणाच्या नावावर होते याची पोलिसांनी चौकशी केली आहे किंवा नाही ? नसेल केली तर ती किती दिवसांत करणार आहेत? अशा पद्धतीने बाकीच्या ठिकाणी देखील शोध घेतला जाणार आहे काय ?

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले आहे त्याबाबत पोलीस विभागाची मदत घेऊन त्या विभागात असे काही प्रकार घडत असतील तर निश्चितपणे त्याची वरिष्ठ अधिकाऱ्याकडून चौकशी केली जाईल आणि त्यावर कारवाई केली जाईल. यापूर्वीच मी सांगितले आहे की, ९ आरोपिंना अटक झालेली असून त्यांच्यावर कारवाई सुरु आहे. त्यांची गाडी देखील जप्त झालेली आहे. आपल्याकडे काही अधिक माहिती असेल तर आपण ती देखील सांगावी. वरिष्ठ पोलीस अधिकारी नेमून त्या भागातील चौकशी करुन कारवाई केली जाईल.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, आरे कॉलनीमध्ये असणारे बंगले हे शासनाचे आहेत तर तिथे अनाधिकृतपणे कामे होतात. तर हे गोडाऊन किंवा बंगला कोणाच्या नावावर याची माननीय मंत्र्यांनी माहिती द्यावी.

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, ती माहिती मी पटलावर ठेवतो. कारण एक सन्माननीय सदस्य जालना जिल्ह्याचा प्रश्न विचारतात तर दुसरे सन्माननीय सदस्य ताबडतोब आरे कॉलनीचा प्रश्न विचारतात आणि मध्येच तिसरे सन्माननीय सदस्य कोल्हापूरचा प्रश्न विचारतात. त्यामुळे अशा प्रकारचे प्रश्न घेताना सुद्धा आपल्या सचिव विभागाने त्यावर लक्ष द्यायला पाहिजे की, प्रश्न स्पेसिफिक एका विषयाच्या संदर्भात असायला पाहिजे. नाहीतर प्रत्येक प्रश्नाचे उत्तर वेगवेगळे येते. एकाच प्रश्नामध्ये चार प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले आहेत.

ता.प्र.क्र.३९९३२.....

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांच्या उत्तराबाबत माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याला माझे समर्थन आहे. आरे कॉलनीमधील दुग्ध विकास विभागाच्या अंतर्गत येणारे तबेले, बंगले हे कोणाच्या तरी नावावर केले जातात. खऱ्या अर्थाने तिथे म्हशी पालन करण्यासाठी गाळे दिले होते. परंतु आता म्हशींची संख्या कमी होत आहे. त्यामुळे उत्पन्न मिळावे यासाठी ते गोडाऊन म्हणून कोणाला तरी भाडयाने दिले जातात. अशा प्रकारच्या गोडाऊनचा वापर अनाधिकृत कामासाठी केला जातो. पूर्ण आरे कॉलनीच्या परिसरात असणारे तबेले, वास्तु, बंगले पूर्वी लायन्ससिकडे होते. ते आता त्यांच्याकडून काढून कोणत्या तरी खाजगी व्यक्तिकडे दिलेले आहेत. तिथे प्रचंड मोठ्या प्रमाणात अशा प्रकारचे व्यवसाय चालतात. यासाठीच माझी हरकत आहे की, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या मार्फत ज्या ठेकेदारांनी अनाधिकृत काम केले आहे अशा प्रकारचे अजून किती बंगले या संपूर्ण आरे कॉलनी परिसरामध्ये दिलेले आहेत. तिथे अशा प्रकारची जी कामे चालतात याची सभागृहाला माहिती मिळणे आवश्यक आहे.

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, मी याचे उत्तर दिलेले आहे की, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडून आपण त्या विभागातील सर्वांची चौकशी करु आणि अशी कामे जर कुठे घडत असतील तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांकडे काही माहिती असेल तर त्यांनी कृपया ती माहिती माझ्याकडे द्यावी. याबाबतीत सदर बाबतीतील आरे कॉलनीतील गोडाऊन दुग्ध शाळा विभागाचे असून श्री. गणेश राणे यांना भाडयाने दिलेले आहे. श्री. गणेश राणे हे कोण आहेत हे मी शोधून काढतो.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, सदरचा प्रश्न हा जालना जिल्ह्यामध्ये अंत्योदय आणि अन्न सुरक्षा योजनेमध्ये काळा बाजार झाला किंवा नाही असा आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, " हे खरे नाही." माननीय मंत्र्यांना माझा स्पेसिफिक प्रश्न आणि विनंती अशी आहे की, जालना जिल्ह्यातील एका एका तालुक्यामध्ये

ता.प्र.क्र.३९९३२.....

श्री. प्रशांत बंब....

किमान ३०० दुकाने आहेत. आपण किमान तालुक्यातील पाच दुकानात.... आम्ही सभागृहामध्ये सांगत आहोत की, या प्रत्येक दुकानामध्ये काळा बाजार झालेला आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३९९६२ ......

श्री. प्रशांत बंब .....

जालना जिल्ह्यातील रँडमली ३०० पैकी ५ दुकाने म्हणजे ५० हजार लाभार्थ्यांपैकी १५०० लाभार्थी तपासायचे आहेत. साधारणपणे एका दुकानात ३०० लाभार्थी असतात. प्रत्येक लाभार्थ्याचा घ्या. मागील ३ महिन्यात त्यांना किती अन्न मिळाले, तांदूळ, गहू किती मिळाले व यासाठी त्यांना किती पैसे द्यावे लागले. हा जवाब लोकल तलाठी नाही तर इतर कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याकडून तपासला जाणार काय, किती दिवसात तपासला जाईल व त्याची माहिती किती दिवसात देणार ?

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, अशी तक्रार आमच्याकडे आलेली नाही. ही अप्राधान्य कार्डे होती. ५९ हजार रुपये किंवा ४४ हजार रुपयांच्या वरती व एक लाखाच्या खाली ४ महिन्यांची व्यवस्था केली होती. तेव्हा ते धान्य महाराष्ट्र शासनातर्फे दिले जात होते. या नंतर ते बंद केले. त्यांची तक्रार अशी आहे की, काही ठिकाणी काळा बाजार होतो. सजेशन फॉर ॲक्शन.

-------

असुधारित प्रत

## इगतपुरी (जि. नाशिक) येथे ऑनलाईन शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये (RCMS) स्प्लीट ऑप्शन उपलब्ध करून देण्याबाबत

**(३) * ४०६७६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी (जि. नाशिक) तालुक्यातील गावपाडे व आदिवासी वस्तीतील सुमारे ३ हजार १७३ विभक्त कुटुंबांतील नागरिकांच्या शिधापत्रिकांचे फॉर्म नवीन डाटा एन्ट्री करण्यासाठी ऑनलाईन शिधापत्रिका प्रणालीमध्ये (RCMS) स्प्लीट हे ऑप्शन तहसिलदार, इगतपुरी (जि.नाशिक) यांच्याकडून तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे अशी मागणी समर्थन संस्थेने मा.अन्न व नागरीपुरवठा मंत्री, प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांच्याकडे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय आहे,
(२) असल्यास, सदर आदिवासी ग्रामस्थांची गैरसोय टाळण्यासाठी शिधापत्रिकांचे प्रलंबित काम सुरू करण्यासाठी ऑनलाईन शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये स्प्लीट ऑप्शन उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ऑनलाईन शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये (RCMS) स्प्लिट ऑप्शन हा पुर्वीपासुनच उपलब्ध असल्याने पुन्हा नव्याने कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, या उत्तरातून अधिकारी कशा प्रकारे मंत्री महोदयांची दिशाभूल करतात, हे लक्षात येत आहे. माझ्याकडे दि. २३ ऑगस्ट २०२१ रोजी चे इगतपुरी येथील तहसीलदार यांचे पत्र आहे. ज्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांना शासकीय पत्र पाठवले होते. हे एकच पत्र नाही तर स्मरण पत्रही

ता.प्र.क्र. ४०६७६....

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

पाठवले आहे. त्यांनी या संबंधी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना विनंती केली आहे की, इगतपुरी तालुक्यात श्रमजिवी संघटनेमार्फत विभक्त शिधापत्रिकेसाठी ३ हजार १७३ फॉर्म प्राप्त झाले असून नवीन एन्ट्री करण्याकरिता आरसीएमएस प्रणालीत स्प्लिीट ऑप्शन उपलब्ध करुन देण्याची विनंती केली. आदिवासी बांधवांना, विभक्त कुटुंबांना हे ऑप्शन दिले जाते. सर्वच क्षेत्रात हे आहे. राजकारणातही ज्यावेळी िमंत्री महोदय श्री. भुजबळ विभक्त झाले तेव्हा आपण ऑप्शन उपलब्ध करुन दिले होते. विभक्त झाल्यावर ऑप्शन उपलब्ध करुन देणे जसे राजकारणात आहे तसे अन्नासाठी देखील आहे. माझी विनंती आहे की, तहसीलदार यांनी अतिशय सक्रीयपणे ..जेव्हा त्यांच्याकडे अर्ज आले तेव्हा तहसीलदार यांनी त्यांचे कर्तव्य पूर्ण केले. त्यांनी हे शासकीय पत्र पाठवले आहे. आपले उप सचिव किंवा ज्यांनी कोणी ब्रिफिंग दिले ते काय समजतात मला माहत नाही. उत्तरात असे नमूद केले आहे की, ऑनलाईन शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये (RCMS) स्प्लिट ऑप्शन हा पूर्वीपासूनच उपलब्ध असल्याने पुन्हा नव्याने कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. तहसीलदार काही तरी टाईम पास करीत होते किंवा जिल्हा पुरवठा अधिकारी टाईमपास करीत होते, किंवा ब्रिफिंग करणारे अधिकारी किराणा दुकानात जाऊन आले होते. या अधिकाऱ्यांनी किराणा दुकानात भेट दिल्यानंतर उत्तर दिले काय असे प्रश्न उपस्थित होत आहे. मी आपल्याला या संबंधीची कागदपत्रे देतो. आपल्याकडे आता माहिती नसल्यास, ती माहिती घेऊन पुन्हा उत्तर द्यावे. ही टेस्ट केस करा. कोणताही कर्मचारी/ अधिकारी हा जर अशा प्रकारे किराणा दुकानात जात असेल किंवा मंत्रालयात असणाऱ्या रिकाम्या बॉटल्सचा तो उत्तराधिकारी असेल तर अशी उत्तरे आपण थांबवली पाहिजे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४०६७६....

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

अध्यक्ष महोदय, हे सभागृह पवित्र आहे. माझी आपल्याला विनंती आहे. मी यावर उपप्रश्न विचारणार नाही. ही कागदपत्रे मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना देतो, त्यांनी अभ्यास करावा. व्यक्तीगतरितीने आपण मला सांगावे की,यामध्ये कोण दोषी आहे. आदिवासी बांधवांना न्याय मिळावा, एवढाच आमचा हेतू आहे.

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य जी कागदपत्रे देत आहेत, त्या बाबत जरुर चौकशी केली जाईल, कारवाई केली जाईल. त्यांनी समर्थन या संस्थेच्या बाबत प्रश्न विचारला आहे. ३ हजार १७३ अर्ज स्प्लिटकरिता दिले होते.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४०६७६ ....

श्री.छगन भुजबळ ...

त्यातील ९७७ अर्ज शासनाने त्यांना स्प्लिट करुन दिले. ४१० लोकांची काहीच कागदपत्रे आली नाहीत. १७८६ अर्ज इतर कारणांमुळे नामंजूर करण्यात आले. इतर जिल्ह्यातील कोण रहिवासी गेले आहेत काय किंवा कुटुंब प्रमुखानेच विभक्त करण्याची मागणी केली असेल तर त्याला ते देता येत नाही. दुबार अर्ज केलेले आहेत, अशी अर्ज नामंजूर करण्याची कारणे साधारणपणे असतात. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे ती मी आणखी तपासून त्यावर जी काही कारवाई करायची ती करेन.

...........

असुधारित प्रत

**सोलापूर शहरातील शिधावाटप दुकानदारांकडून लाभांर्थ्यांची फसवणूक होत असल्याबाबत**

**(४) * ४१८७९ श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिधापत्रिकाधारकांना प्रति व्यक्ती दिड किलो गहू व दोन किलो तांदूळ मोफत वाटप करण्याचा नियम असतांना सोलापूर शहरातील ऑनलाईन तपासणीत शिधावाटप दुकानदारांकडून लाभार्थ्यांना धान्याचे वाटप केल्याची नोंद करण्यात येत आहे, तथापि प्रत्यक्षात धान्याचे वाटप न करता लाभार्थ्यांची फसवणूक होत असून लाभार्थी धान्याच्या लाभापासून वंचित रहात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत शिधावाटप दुकानदारांना जिल्हा पुरवठा विभागाकडून धान्याचे वितरण करण्यात येऊनही लाभार्थ्यांना धान्याचे नियमित वाटप होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी संबंधित शिधावाटप दुकानदारांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधीत दुकानदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, तारांकित प्रश्नाच्या उत्तरामध्ये दुरुस्ती असेल तर आम्ही उत्तरामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागतो. परंतु, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न थोडासा चुकीचा असेल तर मी त्यांच्यातर्फे प्रश्नामध्ये दुरुस्ती करण्याबाबतची परवानगी मागू शकतो काय?

**उपाध्यक्ष** : ठीक आहे.

श्री.छगन भुजबळ : सन्माननीय सदस्यांनी प्रती व्यक्ती "दीड किलो गहू व दोन किलो तांदूळ मोफत...." असे म्हटलेले आहे. परंतु, दीड किलो नाही तर तीन किलो

ता.प्र.क्र. ४१८७९...

श्री.छगन भुजबळ ...

गहू व दोन किलो तांदूळ असे आहे. ते मोफत नाही. ते २-३ रुपये या दराप्रमाणे देतो, अशी मी सन्माननीय सदस्यांच्या तारांकित प्रश्नामध्ये दुरुस्ती करु इच्छितो.

श्री.विजयकुमार देशमुख : अध्यक्ष महोदय, या तारांकित प्रश्नाची लेखी उत्तरे, "हे खरे नाही, प्रश्न उद्भवत नाही", अशी नमूद केलेली आहेत. परंतु, वस्तुस्थिती तशी नाही. माझ्या मतदारसंघात अनेक कार्डधारक आहेत. ज्यांना कार्ड मिळाले त्यातील हजारो कार्डधारकांना आज त्यावर धान्य मिळत नाही. रेशन दुकानावर गेल्यावर असे सांगितले जाते की, तुम्हाला कार्ड मिळाले आहे. परंतु, शासनाकडून अजून धान्य मिळाले नाही. सर्वांना धान्य त्वरित मिळण्याची व्यवस्था करणार काय, सरसकट सर्वांना धान्य मिळणार काय? जे केसरी कार्डधारक आहेत, त्यातील काहींना धान्य मिळते. काही केसरी कार्डधारकांना धान्य मिळत नाही. त्या केसरी कार्डधारकांना देखील सरसकट धान्य मिळेल काय?

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सोलापूर शहरात एकूण रास्त धान्य दुकाने ३१५ तर, ग्रामीण भागात १५५८ आहेत. सोलापूर शहरात ई-पॉस मशिनवर अंगठा देऊनही धान्य मिळालेच नाही, अशा तक्रारी नाहीत. परंतु, कमी धान्य मिळाल्याच्या ९ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने व नियमित तपासणीद्वारे गेल्या वर्षात ३५० दुकानांच्या तपासण्या करण्यात आलेल्या आहेत. त्यातून १३ रास्त भाव दुकानदारांवर कारवाई केलेली आहे. दंडात्मक कारवाई म्हणून ९१ हजार रुपये जमा करण्यात आलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, सोलापूर शहरात एका वर्षामध्ये धान्य न मिळालेल्या अशा एकूण ४८ तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. त्यापैकी जे शिधापत्रिकाधारक हे अप्राधान्य म्हणजे मघाशी सांगितले तेच उत्तर आहे की, आपण ते चार महिन्यांकरिता दिले व त्यांना वाटले की, ते कायम आहे. परंतु, ते कायम नाही. त्यापैकी जे शिधापत्रिकाधारक हे अप्राधान्य एमपीएच होते, त्यांची मर्यादा तपासून जो शिल्लक

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४१८७९...

श्री.छगन भुजबळ ...

इष्टांक असेल त्यामध्ये ते प्राधान्य क्रमांकामध्ये बसत असतील तर त्यांना समाविष्ट करण्यात आलेले आहे. इष्टांकानुसार आपण पुढील कारवाई करु. सोलापूर शहर व्यतिरिक्त ग्रामीण भागात वर्षभरात तालुकानिहाय धान्य न मिळाल्याच्या ६८८ तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ५९० अर्जदार अपात्र आहेत म्हणजे अप्राधान्य कार्डधारक असल्याने त्यांना धान्य वितरित केले नाही. उर्वरित ७५ अर्जदारांच्या बाबत ऑनलाईन डाटा एंट्री करुन धान्य वितरित केले जात आहे. २३ अर्जदार नियमित धान्य उचल करीत नसल्यामुळे त्या संदर्भात त्यांची तपासणी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

श्री.अजय चौधरी : अध्यक्ष महोदय, हा थोडा स्कोपच्या बाहेरचा प्रश्न आहे. परंतु, तो मुंबईकरांकरिता अतिशय महत्वाचा आहे. मुंबईमध्ये जेथे धान्य दुकाने नाहीत, तेथे व्यवस्था म्हणून गाड्या ठेवण्यात आल्या होत्या. त्या सर्व गाड्या आता भंगारात गेलेल्या आहेत, बंद पडलेल्या आहेत. त्यामुळे माझ्या मतदारसंघामध्ये प्रश्न निर्माण झालेला आहे. विशेषत: लालबाग भागातील शिधावाटप दुकान बंद झाल्यामुळे तसेच तेथे धान्य वितरण करणाऱ्या गाड्या देखील बंद झाल्यामुळे त्या लोकांना नायगाव येथील शिधावाटप दुकान दिलेले आहे. धान्य आणण्याकरिता साधारणपणे घरातील ज्येष्ठ लोकच जातात. लालबाग येथील लोकांना धान्य आणण्याकरिता नायगाव येथे जावे लागते. त्यामुळे माझी मंत्री महोदयांना विनंती आहे, आपण या बंद झालेल्या गाड्या तातडीने दुरुस्त करुन पुन्हा सुरु करणार काय किंवा तेथील जवळच्या दुकानामध्ये पुन्हा धान्यपुरवठा करण्याकरिता त्या कार्डधारकांना आपण हस्तांतरित करणार काय?

नंतर श्री.शिंदे ...

ता.प्र.क्र..४१८७९...

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी सांगितल्यानुसार कारवाई करण्यात येईल.

श्री.शेखर निकम : अध्यक्ष महोदय, रत्नागिरी जिल्ह्यातील सर्वच रेशन धान्य दुकानांतील ई-पॉस मशीन बंद आहेत. त्यामुळे सामान्य नागरिकांना धान्य मिळणे कठीण होत आहे. उक्त मशीन तातडीने दुरुस्त करण्यात येईल काय ? मागील १ महिन्यापासून सर्व्हर बंद असून त्याबाबत रत्नागिरी जिल्हा रेशनींग संघटनेने वेळोवेळी तक्रारी दिल्या आहेत. परंतु त्यासंदर्भात कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही, ती तातडीने करण्यात यावी अथवा ऑफ लाईन पद्धतीने धान्य वितरण करण्यात यावे, जेणेकरुन लोकांचे हाल होणार नाहीत.

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांची तक्रार योग्य आहे. काही दिवसांपूर्वी अशा तक्रारी मला प्राप्त झाल्यानंतर मी चौकशी केली. त्यावेळी लक्षात आले की, सर्व्हरमध्ये समस्या निर्माण झाल्याने देशात समस्या निर्माण झाली आहे. सदरहू समस्या दूर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री.सुभाष देशमुख : अध्यक्ष महोदय, काळा बाजार करणाऱ्या दुकानदारांकडून रोख स्वरुपात दंड वसूल केल्याची बाब निदर्शनास आली आहे. काळा बाजारातून लाखो रुपये मिळवण्यात येतात व त्यासाठी नाममात्र दंड भरुन घेऊन पुन्हा त्यांना काळा बाजार करण्यास मोकळीक देण्यात येत आहे. अशा काळा बाजार करणाऱ्या दुकानदारांचा काळया यादीत समावेश करुन त्यांची दुकाने काढून त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल काय, यामुळे लाभापासून वंचित लोकांना धान्य देण्याचा प्रयत्न करण्यात येईल काय ?

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, अशी तक्रार प्राप्त झाल्यास कारवाई करण्यात येईल.

ता.प्र.क्र..४१८७९...

श्री.नारायण कुचे : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न सोलापूर जिल्ह्याच्या संदर्भातील आहे. या अगोदरचा तारांकित प्रश्न जालना जिल्ह्याचा होता. ज्या ठिकाणी काळा बाजार होत आहे तेथे चौकशी समिती नियुक्त करण्यात येईल काय, जालना जिल्ह्यातील काही अधिकारी व पोलीस यंत्रणा यांच्या समन्वयाने काळा बाजार करण्यात येतो त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी यासंदर्भातील अधिक माहिती पुरविल्यास कडक कारवाई करण्यात येईल.

------------

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य यांना विनंती आहे की त्यांनी तारांकित प्रश्नाच्या स्कोपच्या बाहेर प्रश्न विचारु नयेत.

असुधारित प्रत

**नागपूर जिल्ह्यातील रेशन प्रणालीतील दोष दुर करून
पात्र लाभार्थ्यांना तातडीने धान्य वितरीत करण्याबाबत**

**(५) * ४२२७३ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यात मागील ६ महिन्यांपासून रेशन प्रणालीचे लॉगीन बंद असल्यामुळे आधार कार्डशी जोडलेले पात्र लाभार्थी धान्यापासून वंचित असल्याची बाब दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि नागपूर जिल्ह्यातील रेशन प्रणालीतील दोष दूर करून पात्र लाभार्थ्यांना तातडीने धान्य वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मोहन मते : अध्यक्ष महोदय, माझ्या तारांकित प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर असमाधानकारक आहे. नागपूर जिल्ह्यात सद्य:स्थितीत २,७१,९५७ इतक्या लाभार्थींचे आधार सेडींग होऊन सुद्धा लाभार्थी धान्यापासून वंचित आहेत. या अनुषंगाने मी जिल्हाधिकारी यांना दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ रोजी निवेदन दिले होते. त्यावेळी त्यांनी सांगितले की, सदरहू प्रकरणी १ महिन्याच्या कालावधीत कार्यवाही करण्यात येईल व विषय पूर्णत्वास नेण्यात येईल. नागपूर जिल्ह्यातील रेशन प्रणालीतील दोष अद्यापपर्यंत दूर झाला नाही. पात्र लाभार्थी यांना तातडीने धान्य वितरण करण्यासाठी शासन केव्हापर्यंत कार्यवाही करणार आहे ? तसेच शासनाला चुकीची महिति देणाऱ्या अधिकाऱ्यांवर मंत्री महोदय कोणती कारवाई करणार आहेत ?

ता.प्र.क्र. ४२२७३...

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सर्व लाभार्थींना अन्नधान्य देण्यात आले आहे, अशी माहिती मला प्राप्त झाली आहे. कोणाला धान्य मिळाले नाही, असे होण अशक्य आहे. कारण सदरहू शहरामध्ये माननीय विरोधी पक्ष नेता श्री.देवेंद्र फडणवीस राहतात. त्यांच्या कार्यक्षेत्रातील लोकांना धान्य मिळाले नाही तर ते गप्प बसणार नाहीत. नागपूर शहर व ग्रामीण मध्ये ७,८१,७६० शिधापत्रिकाधारकांना योजनेंतर्गत लाभ देण्यात येत आहे.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.छगन भुजबळ......

३ लाख ८० हजार ३४७ शिधापत्रिका धारक हे अप्राधान्य गटातील आहेत. त्यामुळे कोरोना काळामध्ये शासनाने धान्य विकत घेऊन त्यांना फक्त ४ महिन्यांसाठी स्वस्त दराने धान्याचे वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सदर चार महिने झाल्यानंतर त्यांना देण्यात येणारे धान्य बंद करण्यात आले. सदर धान्य बंद केल्यामुळे आमचे धान्य बंद केले असा त्यांच्यामध्ये गैरसमज निर्माण झालेला आहे. अप्राधान्य गटातील रेशन धारकांना ८ रुपये व १२ रुपये या दराने धान्याचे वाटप करण्यात येत होते. जे प्राधान्य क्रमामध्ये आहेत, त्या सर्वांना धान्य देण्यात येत आहे.

ॲड. आशिष जयस्वाल : अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठ्याच्या वितरण व्यवस्थेवर वारंवार प्रश्न उपस्थित होत आहेत. दुसरी बाब अशी आहे की, या मधील खरी वस्तुस्थिती लोकांना माहिती नसल्यामुळे देखील प्रश्न उद्भवत आहेत.

अध्यक्ष महोदय, या विषयावर मी सखोल अभ्यास केलेला आहे आणि यामध्ये ४० सुधारणा करण्याबाबत विनंती केली. परंतु त्यांनी सदर ४० सुधारणांची अंमलबजावणी न केल्यामुळे मी माननीय उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. त्यावर निर्णय देताना राज्य शासनाने सदर ४० सुधारणाची अंमलबजावणी करावी, अशा सूचना दिल्या व तशी नोटीस देखील दिली. त्यानंतर राज्य शासनाने माननीय न्यायालयामध्ये शपथपत्र देखील सादर केले.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने इष्टांक दिल्यानंतर तो इष्टांक राज्य शासनाने जिल्ह्यांना दिला. जिल्ह्यांनी तालुक्याला दिला व तालुक्यांनी गावाला दिला. ग्रामीण भागातील गावांमध्ये अनेक संजय गांधी योजनेचे लाभार्थी आहेत. दिव्यांग आहेत, अनेक विधवा महिला आहेत. परंतु ते एमपीएच मध्ये आहेत. असे असताना देखील शासन या संदर्भात कोणतीही कार्यवाही करीत नाही. वर्षानुवर्षे तीच नावे आहेत. त्यापैकी अनेकांना नोकरी लागली श्रीमंत झाले. परंतु त्यांची नावे शिधापरित्रेमधून वगळण्यात आलेली नाहीत. ग्रामसभेमध्ये अत्यंदोय व एमपीएच यादीचे वाचन झाले पाहिजे, असा राज्य शासनाचा शासन निर्णय आहे. परंतु २७००० ग्रामपंचायतीपैकी एकाही ग्रामपंचायतीच्या ग्रासभेमध्ये अत्यंदोय व एमपीएच यादीचे वाचन केले जात

ॲड. आशिष जैस्वाल......

नाही. तसेच प्रत्येक रेशन दुकानाबाहेर लाभार्थ्यांच्या नावांची यादी लावणे बंधनकारक आहे व तसा शासन निर्णय देखील आहे. परंतु राज्यातील एकाही रेशन दुकानाबाहेर अशा प्रकारची यादी लावली जात नाही. ती यादी लपून ठेवली जाते. त्यामुळेच गरीब लाभार्थी रेशन धान्यापासून वंचित राहत आहेत. आम्हाला लाभ मिळत नाही म्हणून अनेकजण तक्रारी करीत आहेत. त्यामुळे मी याबाबतचा शोध घेतला असता माझ्या मतदारसंघामध्ये ५ हजार कुटुंबाकडे केशरी कार्ड होते, संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी होते. परंतु त्यांची नावे प्राधान्य गटामध्ये नव्हती.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने मार्चपर्यंत सर्वांना मोफत धान्य दिले आहे. परंतु ते धान्य गरीब लोकांना मिळतच नाही. धान्य खरेदीनंतर कोणालाही पावती दिली जात नाही. अशा प्रकारच्या अनेक अडचणी आहेत. या सर्व अडचणी सोडवावयाच्या असतील तर मी सुचविलेल्या ४० सुधारणांची अंमलबजावणी करण्यात यावी. सदर ४० सुधारणांची अंमलबजावणी केली तर अशा प्रकारे प्रश्न वारंवार या सभागृहामध्ये येणार नाहीत. सदर ४० सुधारणांची अंमलबजावणी करण्याबाबत मी अनेक वेळा माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांना विनंती केलेली आहे. परंतु दुर्दैवाने ते या सुधारणांची अंमलबजावणी करीत नाहीत.

अध्यक्ष महोदय, प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघामध्ये अनेक विधवा महिला आहेत, संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी आहेत. प्रत्येक आमदार महोदयांनी याबाबतची माहिती घेतली तर आपल्या लक्षात येईल की, संजय गांधी निराधार योजनेचे व श्रावळबाळ योजनेच्या लाभार्थ्यांची नावे अंत्योदय गटामध्ये आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय उच्च न्यायालयाने ज्या ४० सुधारणा लागू करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत, त्या सर्व सूचना राज्य शासनाने शपथपत्र देऊन मान्य केलेल्या आहेत. परंतु त्या सुचनांची अंमलबजावणी केली जात नाही. जोपर्यंत सदर सूचना अंमलात केली जात नाही, तोपर्यंत हा प्रश्न मार्गी लागणार नाही.

ॲड. आशिष जैस्वाल......

त्यामुळे सदर सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत माझ्यासह अन्य लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेणार आहात काय?

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, इष्टांक वाढवून देण्यासंदर्भात दिनांक ९ डिसेंबर आणि दिनांक ७ मार्च रोजी केंद्र सरकारला पत्र पाठविलेले आहे. आपण उपस्थित केलेल्या अन्य प्रश्नासंदर्भात मी आपल्यासोबत बैठक घेऊन उक्त बैठकीमध्ये चर्चा करेन.

ॲड.राहुल नार्वेकर : अध्यक्ष महोदय, शिधावाटपामध्ये व शिधावाटप कार्यालयामध्ये होणाऱ्या अनियमिततेबाबत आज ५ तारांकित प्रश्न विचारण्यात आलेले आहेत. ही अनियमितता थांबविण्यासाठी प्रत्येक शिधावाटप कार्यालयामध्ये दक्षता समिती स्थापन केली जाते. माझ्या कुलाबा मतदारसंघामध्ये तीन शिधावाटप कार्यालये आहेत. उक्त तिन्ही शिधावाटप कार्यालयामध्ये अद्याप दक्षता समिती स्थापन करण्यात आलेली नाही. या राज्यातील अनेक शिधावाटप कार्यालयामध्ये देखील अद्याप दक्षता समिती स्थापन करण्यात आलेल्या नाहीत. मी याबाबत डीपीडीसीमध्ये देखील प्रश्न उपस्थित केलेला आहे. आज तोच विषय सभागृहामध्ये देखील मांडत आहे. महाविकास आघाडी सरकार स्थापन होऊन अडीच वर्षे पूर्ण झाली आहेत. तरी देखील अद्याप दक्षता समिती स्थापन करण्यात आलेली नाही. शिधावाटप कार्यालयामध्ये दक्षता समिती स्थापन केली नाही तर सामान्य माणसांना न्याय कसा मिळणार, हा माझा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, या राज्यातील किती शिधावाटप कार्यालयामध्ये अद्याप दक्षता समिती स्थापन करण्यात आली नाही व त्याची कारणे काय आहेत?

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, राज्यातील सर्व शिधावाटप कार्यालयामध्ये तत्काळ दक्षता समिती स्थापन करण्याबाबत संबंधित सर्व मंत्री व पालकमंत्री महोदयांना सूचना देण्यात येतील व त्याबाबतचा आढावा देखील घेण्यात येईल.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४०६७६....

श्री. चेतन तुपे : अध्यक्ष महोदय, शिधावाटपाबाबतचा हा प्रश्न आहे. मी सर्व प्रथम माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांचे अभिनंदन करतो. त्यांनी कोरोना काळात अतिशय चांगल्या प्रकारे ही यंत्रणा हाताळली आहे. (...अडथळा...) मी माझा अनुभव सांगत आहे. विरोधकांना सर्वच गोष्टीत वाईट दिसत आहे.

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, माझी स्तुती केलेली विरोधकांना आवडत नसेल तर त्यांनी ती करु नये.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. चेतन तुपे : अध्यक्ष महोदय, चांगल्या गोष्टीला चांगले म्हणणे वाईट आहे काय ? मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. शेतात काम करीत असताना आजुबाजूला शेळया, मेंढ्या, कुत्रे, बैल फिरत असतात. त्यांच्यात काम करण्याची मला सवय आहे. त्यामुळे विरोधकांच्या गोंधळामध्ये मी बोलण्याचे थांबविणार नाही. शेतातील जनावरे असेच ओरडत असतात. त्यामुळे मला काही फरक पडत नाही.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. चेतन तुपे यांनी बोलत असताना या सदनातील सन्माननीय सदस्यांची तुलना शेळी, मेंढी, कुत्रे यांच्याबरोबर केली आहे. त्यामुळे मी आपणास विनंती करतो की, हा भाग सभागृहाच्या पटलावरून काढून टाकावा आणि त्यांनी सभागृहाची माफी मागावी, अशी आमची मागणी आहे.

श्री. चेतन तुपे : अध्यक्ष महोदय, शेतातील शेतकऱ्यांच्या शेळया मेंढ्यावर शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह चालतो. त्याबाबत मी उल्लेख केला आहे. याचा विरोधकांना राग येण्याचे कारण नाही.

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी प्रश्नाच्या अनुषंगाने बोलावे.

ता.प्र.क्र. ४०६७६....

श्री. चेतन तुपे : अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून अतिशय चांगले काम झाले आहे. सन २०११ मध्ये जनगणना झाली होती. मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना प्रश्न विचारु इच्छितो. सन २०१३ मध्ये इष्टांक देण्यात आला होता. त्यानंतर केंद्र सरकारने राज्य सरकारला इष्टांक वाढवून दिला आहे काय ? जर तो वाढवून दिला नसेल तर त्याची कारणे काय आहेत ? पुढील जनगणना करण्यासाठी केंद्र सरकारला वेळ नाही. त्यामुळे इष्टांक वाढविला जात नाही. यामुळे दोष दिसून येत आहे. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, इष्टांक वाढविण्यासाठी आणि जनगणना लवकरात लवकर करण्यासाठी केंद्र सरकारकडे विनंती केली जाणार आहे काय ?

अध्यक्ष महोदय, लोकसंख्येच्या किती टक्के लोकांना अन्नधान्य दिले जाते ? तसेच जनगणना झाली नाही. महाराष्ट्रात वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक लोक उपाशी राहत आहेत. त्यासाठी काही लोक हा वितरण व्यवस्थेतील दोष असल्याचे सांगत आहेत. हा दोष कोणाचा हे आपण सांगितले पाहिजे. जनगणना न झाल्यामुळे अनेक लोक उपाशीपोटी राहत आहेत. हा दोष कोणाचा आहे ? याबाबत केंद्र सरकार कोणती भूमिका घेणार आहे ? याचे उत्तर केंद्र सरकारला द्यावे लागेल. महाराष्ट्रातील जनतेला अर्धपोटी ठेवणाऱ्या केंद्र सरकारला याचा जाब विचारला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माझा हडपसर मतदारसंघ आहे. या मतदारसंघामध्ये १ लाख ४३ हजार इष्टांक मांडलेला आहे. माझ्या मतदारसंघातील लोकांना याची गरज आहे. आता तहसिलदारांकडून दाखला घेतला जात नाही. आता स्वत: डिक्लिरेशन करावे लागत आहे. त्याबाबत मी शासनाने अभिनंदन करतो आणि माझ्या मतदारसंघातील १ लाख ४३ हजारांचा इष्टांक वाढवून द्यावा, अशी मी मंत्री महोदयांकडे विंनती करतो.

यानंतर श्री. चौधरी....

ता.प्र.क्र.४२२७२.....

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कोरोना महामारीनंतर बऱ्याच दिवसांनंतर सभागृहाचे कामकाज सुरळीत सुरु आहे. सभागृहाच्या कामकाजातील प्रश्नोत्तराचा तास हा अत्यंत महत्त्वाचा असतो. एका बाजूला प्रश्नोत्तराच्या तासामध्ये प्रश्न उपस्थित करण्यासाठी आम्ही आपणाकडे जीव तोडून संधी मागत असतानाही ती आम्हाला मिळत नाही. परंतु दुसऱ्या बाजूला काही सन्माननीय सदस्य भाषणे करीत आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी मुद्देसूद व नेमके प्रश्न विचारावेत. कारण प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सर्वच सन्माननीय सदस्यांना न्याय मिळावा यासाठी सर्वांनीच नेमके बोलले पाहिजे. मंत्री महोदयांनी देखील मोजकेच उत्तर देऊन लोकांना न्याय द्यावा. भाषणे करण्याची ही वेळ नाही, एवढाच माझा मुद्दा आहे.

**उपाध्यक्ष :** ठीक आहे. मंत्री महोदयांनी उत्तरास सुरुवात करावी.

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सध्याचा इष्टांक हा सन २०११ च्या जनगणनेतील लोकसंख्येवर आधारित आहे. केंद्र सरकारकडून त्यानंतर तो वाढवून देण्यात आलेला नाही. मी मघाशी देखील सांगितले आहे की, आपण यासंदर्भात केंद्र सरकारला दोन वेळा पत्र दिले आहे. यानंतरही त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल. हा इष्टांक वाढवून घेण्यासाठी माननीय विरोधी पक्षाच्या नेत्यांची देखील दिल्लीमध्ये मदत घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, किती टक्के लाभार्थी आहेत, हा दुसरा प्रश्न होता. त्याबाबत सांगू इच्छितो की, १३ कोटी लोकसंख्येपैकी सुमारे ७ कोटी लोकसंख्येचा या योजनेत समावेश होतो. त्याची टक्केवारी सुमारे ५५ टक्के एवढी आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य व आमचे मित्र श्री.प्रकाश आबिटकर यांनी मांडलेल्या भूमिकेशी आम्ही सहमत आहोत.

अध्यक्ष महोदय, हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. आज आपण स्वातंत्र्य मिळाल्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये असताना शेवटच्या माणसापर्यंत

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४२२७२.....

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

किमान अन्न तरी पोहचले पाहिजे. बाकी सोयीसुविधा पोहचविण्यामध्ये तर आपण अपयशी ठरलो आहोत, हे देशाचे दुर्दैव आहे.

अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम आल्यानंतर राज्यातील लाभार्थी संख्या वाढवायची नाही असा निर्णय तत्कालीन पंतप्रधान माननीय श्री.मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात झाला. त्याबाबतचा पत्रव्यवहार देखील आता माझ्याकडे उपलब्ध आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री पदी असताना निर्णय घेऊन राज्य सरकारच्या तिजोरीतून सुमारे ८०० ते ९०० कोटी रुपये गोर-गरिबांच्या अन्नासाठी खर्च करण्यास सुरुवात केली. म्हणजेच आपण केवळ केंद्र सरकारवर अवलंबून राहिलो नाही.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितलेल्या आकडेवारीनुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी राज्यामध्ये २५६ लक्ष ३४ हजार शिधापत्रिकाधारक आहेत. यापैकी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत १५३ लक्ष ३७ हजार शिधापत्रिकाधारक येतात. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी आणि हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे सरकार होते त्यावेळी आम्ही यासाठी सुमारे ८५० कोटी रुपये खर्च करीत होतो. मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे केंद्र सरकारला पत्र लिहायचे असतील तर लिहावेत, आमच्यासोबत प्रवास करायचा असेल तर करु, हवे तर पदयात्रा काढून आपण तेथपर्यंत पोहचू. परंतु तोपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या या महाराष्ट्रातील कोणीही उपाशी राहता कामा नये. ४ लक्ष ८४ हजार ११८ कोटी रुपयांचा आपला मागच्या वर्षीचा अर्थसंकल्प असताना गरिबांना अन्न देताना मंत्री महोदयांकडून असे उत्तर अमान्य आहे. मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगावे की, प्राधान्यक्रमाने ज्या कुटुंबांना लाभ देणे आवश्यक आहे त्यांच्यासाठी राज्य सरकार आपल्या तिजोरीतून खर्च करील.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४२२७२.....

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

अध्यक्ष महोदय, गरिबांसाठी हे पैसे नाहीत तर त्यांचे काय करायचे आहे ? पुण्याच्या रिंग रोडसाठी १५ हजार कोटी रुपये, नांदेडच्या रिंग रोडसाठी ६.५ हजार कोटी रुपये दिले जातात परंतु गरिबांच्या अन्नधान्याचा प्रश्न येतो तेव्हा "केंद्र सरकार, केंद्र सरकार..." अशी उत्तरे दिली जातात. आपण आज गरिबांना धान्य देण्याबाबत मान्य केले नाही तर हे राज्य देखील केंद्र सरकारला देण्यासाठी जीव तोडून मेहनत केल्याशिवाय आम्ही राहणार नाहीत. गरिबांच्या अन्न द्यावयाच्या वेळी आपल्याला केंद्र सरकारची आठवण येते का ? आमच्या सरकारच्या काळात अन्नधान्यासाठी ८५० कोटी रुपये देण्याचा निर्णय आम्ही घेतला होता. त्या मार्गावरुन जय भवानी, जय शिवाजी म्हणत आपण पुढे जाणार आहात का ?

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, अन्न सुरक्षा कायदा अस्तित्त्वात येण्यापूर्वी राज्यामध्ये वेगवेगळया रंगाचे रेशन कार्ड होते. आपण धान्याची खरेदी करुन ते अर्ध्या किंवा पाऊण किमतीमध्ये लाभार्थ्यांना विकत होतो. अन्न सुरक्षा कायदा आल्यानंतर त्याप्रमाणे अनुज्ञेय करण्यात आलेल्या मर्यादेमध्येच आपले लाभार्थी बसविण्याबाबत आपल्याला निर्देश देण्यात आले.

यानंतर श्री.धुमाळे.....

ता.प्र.क्र.४२२७३...

श्री. छगन भुजबळ...

साधारणपणे ५९ हजार रुपये हे मुंबई शहरासाठी होते. त्यावेळी मी त्या मंत्रिमंडळामध्ये होतो आणि मीच तो प्रश्न उपस्थित केला होता की, आता ५९ हजारापर्यंत झाले. पण १ लाखापर्यंत जे लोक आहेत त्यांचे काय करायचे. त्यावेळी त्या वर्षासाठी राज्य सरकारने ११०० कोटी रुपये खर्च करुन थोड्या कमी भावामध्ये जे शिल्लक राहिले होते त्यांना सुध्दा आपण धान्य दिले. त्यानंतर आपले सरकार आले आणि आपल्या सरकारने राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारची योजना राबविण्यास सुरूवात केली. ती योजना आमच्या सरकारनेही सुरू ठेवली आहे आणि त्यानुसार धान्य वाटप करतो. आता १४ जिल्ह्यांचा प्रश्न सुटला आहे. पण इतर सर्व जिल्ह्यांमध्ये सरसकट द्यायचे असेल तर तो फार मोठा प्रपंच आहे आणि हे आपल्याला सुध्दा लक्षात येण्यास हरकत नाही. आम्ही याबाबत आपल्याशी चर्चा करु आणि हा प्रश्न कशा पध्दतीने सोडविता येईल ते पाहू. आपण जर आम्हाला दिल्लीला घेऊन गेलात तर आम्ही जरुर आपल्यासमवेत येऊ. केंद्र शासनाला विनंती करु की, आम्हाला इतर जिल्ह्यांनाही ही सवलत द्यायची असल्यामुळे हा इष्टांक वाढवावा. त्यासाठी आपण आम्हाला मदत करणार आहात, याची आम्हाला खात्री आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आम्ही १४ जिल्ह्यांसाठी ही योजना सुरू ठेवलेली आहे आणि त्यामध्ये कोणतीही कपात केलेली नाही. कोरोना काळामध्ये आपण... आता आजच बजेट येणार आहे. आपण ६० हजार कोटी दिल्यामुळे जवळपास डेफिसिएटचा प्रॉब्लेम झाला असे काही तरी मी ऐकले होते. संपूर्ण महाराष्ट्रातील १३ कोटी लोकांना अशा पध्दतीने धान्य देणे कसे शक्य होईल ? म्हणून माझे असे म्हणणे आहे की, आता आपण जो खर्च करीत आहोत तो या अडचणीच्या काळात आणि अर्थव्यवस्थेवर ताण असतानाही करीत आहोत. अर्थव्यवस्थेवर ताण असताना सुध्दा आपण इतरांसाठी ४५० कोटी रुपये खर्च करुन जे अप्राधान्यमध्ये होते त्यांना सुध्दा ८ रुपये आणि १२ रुपये दराने धान्य पुरवठा केला

ता.प्र.क्र.४२२७३...

श्री. छगन भुजबळ...

आहे.  त्याही पुढे जर आपल्याला धान्य पुरवठा करायचा असेल तर आपल्याला केंद्र सरकारची मदत घ्यावी लागेल, एवढेच मला सांगायचे आहे.

असुधारित प्रत

**राज्यातील सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या थकबाकीचा हप्ता मिळणेबाबत**

**(६) * ३७८५७ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक शिक्षक तसेच सर्व जिल्हयाचे शिक्षण उपसंचालक व जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी व अधिक्षक तसेच वेतन पथक कर्मचाऱ्यांना शिक्षण संचालकांच्या दिनांक ०६ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रानुसार वेतनाच्या थकबाकीची रक्कम माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये नियमित देयकासोबत अदा करण्याच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना केल्या असून राज्यातील सन २०१६ पासून सेवा निवृत्त झालेल्या शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या थकबाकीचा पहिला हप्ता अद्याप मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवृत्तीनंतर शासकीय वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचा लाभ मिळत नसल्याने शासनाने सेवानिवृत्त शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कुटुंबाच्या उदर निर्वाहासाठी सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्याची थकबाकीची रक्कम एकत्रीतपणे निवृत्तीवेतनधारकाच्या बँकखात्यात तातडीने जमा करण्याची व्यवस्था करावी अशी मागणी टीचर्स डेमोक्रेटिक फ्रंटचे उपाध्यक्ष श्री. राजेश पंड्या यांनी शिक्षणमंत्री, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मा.उपमुख्यमंत्री, मा.मुख्यमंत्री आदींकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(३) तसेच सोलापूर जिल्हयातील सेवानिवृत्त शिक्षकांनाही दरमहा निवृत्तीवेतन वेळेवर मिळत नसल्याने त्यांचे दैनंदिन जीवन जगणे हलाखीचे झाले आहे तसेच विधवा परितक्त्या यांना उदरनिर्वाहासाठी मिळणारे कुटुंब निवृत्तीवेतन वेळेवर मिळत नसल्याची सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने शिक्षण आयुक्त

ता.प्र.क्र.३७८५७...

श्री. सुनील राणे...

यांचेमार्फत शासनाकडे निवृत्ती वेतनाकरीता आर्थिक तरतूद करण्याची मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सेवानिवृत्त शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी व कुटुंबनिवृत्तीवेतन वेळेत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशत: खरे आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) सदर निवेदने प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, सोलापूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी, २०२२ चे निवृत्ती वेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन अदा करण्यात आले असून माहे फेब्रुवारी, २०२२ चे निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन अनुदान संचालक स्तरावरुन वितरीत करण्यात आली आहे. तसेच सन २०२०-२१ पासून संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाल्यामुळे प्रत्येक महिन्यांकरिता वेतनासाठी आवश्यक असणारा निधी मर्यादित मासिक स्वरुपात तात्पुरती व्यवस्था म्हणून वित्त विभागाकडून खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होता. सबब काही जिल्ह्यांमध्ये सातव्या वेतन आयोगाचा पहिला हप्ता अदा करण्यात आलेला नाही. आता निधीच्या उपलब्धतेनुसार सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सुनील राणे : अध्यक्ष महोदय, आपल्या सर्वांना कल्पना आहे की, राज्यातील सेवा निवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या थकबाकीचा पहिला व दुसरा हप्ता अद्याप मिळणेबाबतचा

ता.प्र.क्र.३७८५७...

श्री. सुनील राणे...

हा विषय आहे.

(सन्माननीय सदस्य कॅप्टन आर. तमिल सेल्वन हे डायसवर जाऊन बोलण्याची संधी मिळावी म्हणून माननीय उपाध्यक्षांना विनंती करीत असतात.)

**उपाध्यक्ष** : सम्माननीय सदस्य कॅप्टन आर. तमिल सेल्वन जी, कृपया आप अपनी जगह पर बैठिए, मैं आपको बाद में बोलने का अवसर देता हूं.

श्री. सुनील राणे : सरकारने याबाबत जे उत्तर दिले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, निधीच्या उपलब्धतेनुसार ७ व्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, ज्या ज्या वेळी याबाबत चर्चा झाल्या आणि ज्यावेळी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत धोरण निश्चित केले गेले त्यावेळी सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचना दिल्या गेल्या. परंतु सूचना दिल्यानंतरही त्या वेतनाची थकबाकी अदा न करण्याची कारणे कोणती आहेत, हा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, थकबाकीचा पहिला हप्ता आतापर्यंत कोणकोणत्या जिल्ह्यात देण्यात आला नाही. आपण वारंवार सांगतो की, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पहिल्या आणि दुसऱ्या हप्त्याबाबत आपण सूचना दिल्या आहेत. मात्र आतापर्यंत त्यांना पहिला आणि दुसरा हप्त्याची थकबाकी देण्यात आलेली नाही. ७ व्या वेतन आयोगातील फरकाचा थकबाकीचा पहिला आणि दुसरा हप्ता त्यांना अदा करण्यासाठी किती वेळ लागेल हा प्रश्न आपल्या वतीने मंत्री महोदयांना आहे.

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे की, शासनाने पत्रान्वये अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. आम्ही जानेवारी आणि मार्च महिन्यात सुध्दा अशा पध्दतीच्या सूचना पत्रान्वये केल्या आहेत.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३७८५७....

प्रा.वर्षा गायकवाड .....

किती ठिकाणी पहिला हप्ता पोहोचलेला आहे, असा सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न होता. १६६३ कोटी रुपयांची आम्ही मागणी केली होती. त्यापैकी आम्हाला ९११ कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. ते पैसे आता आम्ही वितरीत सुद्धा केलेले आहेत. बाकीची ७७२ कोटी रुपयांची थकबाकी आहे. किती शिक्षकांना आणि किती जिल्ह्यामध्ये पैसे वितरित केले असा त्यांचा प्रश्न होता. याबाबत मी त्यांना सांगू इच्छिते की, माध्यमिक शाळेसाठी नागपूर वगळता राज्यातील सर्व शाळांना तसेच जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांसाठी १२ जिल्ह्यामध्ये पूर्णपणे पहिला हप्ता दिलेला आहे. २३ जिल्ह्यामध्ये अंशत: पैसे दिलेले आहेत कारण ज्याप्रमाणे समप्रमाणात वाटप करता येईल त्याप्रमाणे पैसे वितरित केले आहेत. राज्यातील सर्व खाजगी प्राथमिक शाळांना पहिला हप्ता दिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत मी असे सांगू इच्छिते की, एकूण शिक्षकांची संख्या ही १ लाख ७२ हजार १९७ एवढी आहे. त्यापैकी ज्यांना पहिला हप्ता गेलेला आहे त्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या १ लाख ३९ हजार ६६ एवढी आहे. ज्यांना पहिला हप्ता प्राप्त झाला नाही त्यांची संख्या ३३ हजार १३१ आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी उर्वरित दुसरा हप्ता आणि पहिल्या हफ्त्यामध्ये राहिलेल्या कर्मचाऱ्यांना पैसे कसे द्यायचे हा जो महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत आपण सर्वजण चर्चा करीत आहोत. त्यासाठी आम्ही सुधारित अंदाजपत्रकामध्ये मागणी केलेली आहे. आताच्या बजेटमध्ये ती मागणी पूर्ण होईल. कारणयापूर्वी सुद्धा आम्ही पैसे मागितले होते आणि ते आम्हाला मिळालेही होते. परंतु ते पूर्ण प्रमाणात पैसे देऊ शकले नाहीत कारण तेव्हा कोरोनाचा काळ होता आणि त्या काळात काही वित्तिय अटी शर्ती होत्या. त्यामुळे आपल्याला काही पैसे मिळू शकलेले नाहीत. यापूर्वी तीन महिन्यासाठी वेतनाचे पैसे मिळत होते परंतु आता ते

ता.प्र.क्र.३७८५७....

प्रा.वर्षा गायकवाड .....

एक महिन्यासाठी देण्याचा वित्त विभागाने निर्णय दिला आहे. त्यामुळे मला अपेक्षा आहे की, येणाऱ्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये आम्ही २ हजार कोटी रुपयांची मागणी केलेली आहे, ती मिळाल्यानंतर हे सर्व प्रश्न सुटतील.

श्री. सुनिल राणे : अध्यक्ष महोदय, पहिला हप्ता ३३ हजार शिक्षकांना द्यायचा बाकी आहे असे माननीय मंत्री म्हणाल्या आहेत. त्या शिक्षकांचा पहिला हप्ता बाकी असेल तर याबाबत बजेटमध्ये चर्चा करुन त्यासाठी २ हजार कोटी रुपयांची प्रस्तावित रक्कम मागण्यात येईल, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांना मला असे विचारायचे आहे की, या ३३ हजार शिक्षकांना निवृत्त झाल्यानंतर वेतनाचा पहिला हप्ता कधी देणार आहात ? याची किमान तारीख सांगावी. कारण जानेवारी महिन्यापासून आपण हा हप्ता देणार, देणार असे म्हणत आहात. याचे किमान उत्तर माननीय मंत्र्यांनी द्यावे, अशी आमची इच्छा आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना मी उत्तरामध्ये सांगितले की, जवळपास १ लाख ४० हजार शिक्षकांना हप्ता दिलेला आहे. उर्वरित ज्या शिक्षकांना हप्ता देण्याचे बाकी आहे त्यासाठी आताच्या बजेटमध्ये काही देता आले तर यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी आम्ही सुधारित अंदाजपत्रकामध्ये २ हजार कोटी रुपये मागितले आहेत. आमचा असाच प्रयत्न आहे की, पहिला आणि दुसरा हप्ता या दोन्हींचे पैसे लवकरात लवकत वितरीत करावेत यासाठी आमचा सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. पण आपल्याला सुद्धा माहीत आहे की, त्यासाठी लागणारे बजट मोठे होते आणि मधल्या कोरोनाच्या काळात दिनांक ४ मे चा आणि जून महिन्यात एक शासन निर्णय आला होता. त्यामुळे शिक्षण विभागाची थोडी परिस्थिती बदलली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आम्ही ते पैसे वितरीत करु.

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन है. मैं रेशन के विषय पर बोलना चाहता हूं.

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, रेशनिंगच्या विषयाचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, मैं बोलुंगा ही नहीं, तो मैं मेरे विभाग का रिजाईन दे दूंगा. क्या मैं बोल नहीं सकता? मेरा हक नहीं है ? मेरे विभाग की गरीब जनता तकलीफ में है. मुंबई शहर में रेशन की दुकान में बहुत अन्याय हो रहा है.

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, रेशनचा विषय केव्हाचाच संपला आहे.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, गरीब जनता राशन की दुकान में जाती है, तो पहले पूछता है. मेरी मशीन खराब है......

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

ता.प्र.क्र.३७८५७....

श्री. सिद्धार्थ शिरोळे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांना माझे स्पेसिफिक असे दोन प्रश्न आहेत. या प्रश्नाच्या प्रक्रियेला किती वेळ लागेल याची त्यांनी स्पष्टता द्यावी. महाराष्ट्रातील सर्व अनुदानित शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व प्राध्यापक यांना अश्वासित केलेली जुनी पेन्शन योजना ही कधी लागू करण्यात येणार आहे ?

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

ता. प्र.क्र. ३७८५७.....

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सदर प्रश्न आजच्या प्रश्नाशी संबंधित नाही. तरी देखील मी सांगू इच्छिते की, आम्ही एक कमिटी तयार केली होती. या कमिटीचा सेवा निवृत्ती विषयीचा अहवाल आमच्याकडे आला असून त्याचा निर्णय कॅबिनेटच्या बैठकीमध्ये होईल. आजच बजेट सादर होत आहे. मला वाटते की, आमच्याकडे निधी आल्यानंतर तो वितरित केला जाईल.

श्री.सुभाष देशमुख : अध्यक्ष महोदय, सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षकांनी आपल्याकडे तक्रारी केल्या आहेत. मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की,दोन वर्षांपासून किती शिक्षक निवृत्त झालेले आहेत. अनेक शिक्षक निवृत्त होऊन देखील कागदपत्रांची पूर्तता झाली नसल्याने त्यांना निवृत्ती वेतन दिले जात नाही. तसेच काही व्यक्तीगत अडचणी, व्यक्तीगत द्वेषामुळे काही प्रकरणे प्रलंबित आहेत. जी प्रकरणे प्रलंबित आहेत, त्यांना तत्काळ पेन्शन सुरु करावी. सोलापूर जिल्ह्यात दोन वर्षात किती शिक्षक निवृत्त झाले व किती जणांचे पेन्शन थकीत आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सोलापूर जिल्ह्यात सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या ८ हजार ७७६ आहे. आपल्याकडे स्पेसिफिक तक्रार असेल तर त्या बाबत मला सांगावे. पहिला हप्ता सन २०२०मध्ये देण्यात आला. सोलापूर असा जिल्हा आहे की, येथे दुसरा हप्ता देखील दिलेला आहे. हा दुसरा हप्ता सप्टेंबर, २०२१ मध्ये दिलेला आहे. सोलापूरला पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचे पैसे दिले आहेत. जर आपल्याकडे काही तक्रार असेल की, कोणाचे काम झाले नाही तर आपण मला त्या बाबत सांगावे. मी त्यामध्ये लक्ष देईन.

श्री. हिरामण खोसकर : अध्यक्ष महोदय, हा केवळ सोलापूर जिल्ह्याचा प्रश्न नाही. हा संपूर्ण राज्याचा विषय आहे. नाशिक जिल्ह्यातील काही शिक्षक आपल्याकडे आले,त्यांनी पाठपुरावा केला. माननीय शिक्षण मंत्री यांच्याकडे देखील ते गेले होते. शिक्षकांना न्याय देण्याचा विचार शासनाकडून केला जाणार आहे काय ?

ता. प्र.क्र. ३७८५७.....

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, त्यांनी सोलापूर विषयी स्पेसिफिक प्रश्न विचारला असल्यामुळे मी त्याबाबत उत्तर दिले. राज्याच्या बाबतीत मी या पूर्वीच सांगितले आहे. माध्यमिक करिता नागपूर विभागात सर्वांना पहिला हप्ता मिळाला आहे. प्राथमिक संबंधी मी माहिती दिली आहे. दुसऱ्या हप्त्याकरिता सुधारित अंदाजपत्रकामध्ये निधी मागितलेला आहे.

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आहे. माझा माननीय शिक्षण मंत्री यांना प्रश्न आहे. काझी समिती शुल्क नियंत्रणाबाबत विचार करण्याकरिता शासनाने नेमली. उच्च न्यायालयात गेल्यानंतर विभागीय शुल्क नियंत्रण समित्या स्थापन केल्या आहेत. शुल्क नियंत्रण समितीच्या कारभारात सुधारणा सूचवण्याकरिता जी समिती नेमली आहे त्याचा अहवाल कधीपर्यंत जनतेकरिता खुला करणार ? त्याचे मिनिट्स देण्यास सचिवांनी नकार दिला. या संबंधी उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे.

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, खरे तर हा प्रश्न आजच्या प्रश्नाशी निगडित नाही. पेन्शन व सातव्या वेतन आयोगाबाबतचा मूळ प्रश्न आहे. शासनाने काझी समिती तयार केलेली आहे. शैक्षणिक शुल्कच्या संबंधी ही समिती पालक असोसिएशन, एनजीओ यांच्याशी चर्चा करीत आहे. आपण सांगितले ते बरोबर आहे. आता आपण डीएफआरसी फॉर्म केल्या आहेत. त्यांच्याकरिता कायद्यात बदल केला जाणार आहे. शैक्षणिक शुल्कासंबंधी कायद्यात जे बदल करायचे आहेत त्या बाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. ते येणाऱ्या काळात आमच्याकडे येतील. या संबंधी अहवाल तयार झालेला आहे. येणाऱ्या आठ दिवसात कदाचित आमच्याकडे ते अहवाल सादर करतील. या नंतर त्यावर चर्चा करु.

--------

## जत (जि.सांगली) तालुक्यातील बागेवाडी येथील राष्ट्रीय पेयजल योजनेत झालेला गैरव्यवहार

**(७) * ४००३६ श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील बागेवाडी येथील राष्ट्रीय पेयजल योजनेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामाची चौकशी करण्याकरिता जत पंचायत समितीसमोर स्थानिक लोकप्रतिनिधींनी आमरण उपोषण केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणातील दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) स्थानिक नागरीक श्री. राजाराम केंचाणा व्हनमाने यांनी योजनेच्या चौकशीकरिता दिनांक ११.०१.२०२२ रोजी आमरण उपोषण केले होते. त्यांना ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जत कार्यालयाकडून योजनेची पूर्ण माहिती दिली. तद्नंतर त्यांनी दिनांक १३.०१.२०२२ रोजी उपोषण सोडले.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, ही योजना सन २०११ साली मंजूर झाली. त्याचा कार्यकाल साधारणपणे दोन वर्षासाठी होता. आता सन २०२१ उजाडले आहे. आजही ही योजना पूर्ण झालेली नाही.

**उपाध्यक्ष :** थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, ही योजना कार्यान्वित करण्यासाठी खोट्या पद्धतीची लोकसंख्या दाखवली गेली. या योजनेत अनियमितता झालेली आहे. यामुळे त्रयस्थ यंत्रणेकडून तपासणी करण्याबाबत बैठक घेतली जाणार काय ?

यानंतर श्रीमती गिरप...

ता.प्र.क्र. ४००३६ ...

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, चौकशी करण्यात यावी. त्यांनी सुचविल्याप्रमाणे चौकशी करण्यात येईल. तसेच, आमदार महोदयांसमवेत बैठक घेण्यात येईल.

**उपाध्यक्ष** : आमदार महोदयां समवेत एक बैठक घ्यावी. प्रश्नोत्तराचा तास आता संपलेला आहे.

...........

असुधारित प्रत

असुधारित प्रत

## माहितीचा मुद्दा

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, आपण मला एका महत्वाच्या विषयावर माझे मत मांडण्याची अनुमती दिली. मी खूप खूप आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, आपण राजकारणात येतो. आपल्यासाठी काही आदर्श असतात, काही प्रेरणा देणारे असतात. काही ऊर्जा देणारे असतात. काही असे महामानव असतात की, आपल्या आयुष्यावर त्यांचा जीवनाचा प्रभाव पडतो. यापैकी एक म्हणजे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजीराजे महाराज. आज त्यांचे पुण्यस्मरण करण्याचा दिवस आहे. मी या निमित्ताने सर्वप्रथम त्यांचे स्मरण करतो, आदरांजली व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, विधानसभेचा एक सदस्य म्हणून मला सरकार समोर एकच भावना व्यक्त करावयाची आहे. औरंगाबादचे नाव संभाजीनगर करावे अशी घोषणा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर १९८८ मध्ये हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी २७ नगरसेवक निवडून आल्यानंतर विजयोत्सव साजरा करताना केली. तो एक विजयोत्सव होता. आज एक विजयोत्सव सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य सरकारने या संदर्भामध्ये ... (अडथळा)... औरंगाबादचे नाव संभाजीनगर करण्यास तुमचा काही आक्षेप आहे काय, कोणाचा आक्षेप असेल तर मी बसतो. मी कशावर बोलत आहे तर, मी अनुमती घेऊन बोलत आहे. अध्यक्ष महोदयांनी एका गंभीर विषयावर बोलण्याकरिता मला अनुमती दिली आहे. या विषयावर राजकारण नाही, पक्षाची धोरणे नाहीत, खड्डयात गेली पक्षाची धोरणे. प्रथम महाराष्ट्राचा, आमचा देशाभिमानाचा इतिहास आहे. निवडणुका, एबी फॉर्म, आमदारकी गेली खड्डयात.

अध्यक्ष महोदय, सन २०१६ मध्ये या संदर्भातील प्रस्ताव भारतीय जनता पक्ष व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जी जुनी शिवसेना होती त्यांनी दि.१३.६.२०१६ रोजी दिला. नाव बदलण्यासाठी एक प्रोसेस असते. त्या प्रोसेसनुसार तो प्रस्ताव देण्यात आला. मग दि.४ एप्रिल, २०१८, दि. २२ नोव्हेंबर, २०१८

श्री.सुधीर मुनगंटीवार ...

आणि ती पूर्ण प्रोसेस आता दि. ४ मार्च, २०२० रोजी पूर्ण झाली. या प्रोसेसनुसार डॉ.एस.पी. सावरगावकर, सहाय्यक आयुक्त, महसूल यांनी हा प्रस्ताव ...माननीय ॲड.अनिल परब आपण संसदीय कामकाज मंत्री आहात. आपण चांगले काम करता, एखादे चांगले काम अजून होऊ द्या. हा प्रस्ताव आता आपल्याकडे आला आहे.

अध्यक्ष महोदय, आज स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजीराजे महाराज यांच्याप्रती आदरांजली व्यक्त करण्याचा दिवस आहे. १० हजार कोटी वाघ एकीकडे आणि स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजीराजे महाराज यांची शक्ती एकीकडे हे तर तुम्ही मानता, याबद्दल तर तुमचे दुमत असण्याचे कारण नाही.

अध्यक्ष महोदय, आपण अनेक नावे बदलली. एअरपोर्टचे नाव बदलतो. एखादा प्रश्न आम्ही विचारला तर, माननीय ॲड.अनिल परब आपण केंद्र शासनाकडे जाऊ, सर्वजण जाऊ असे सांगता. मी तुम्हाला या सभागृहात वचन देतो. तुम्हाला या विषयावर केंद्र शासनाची मदत लागत असेल तर मी स्वत: तेथे मुक्काम करेन व केंद्र शासनाने अनुमती दिली नाही, तर मी राजीनामा देईन, आयुष्यात निवडणूक लढवणार नाही.

अध्यक्ष महोदय, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचा सन १९८८ मधील शब्द आपण पूर्ण करायचा म्हणजे केवळ स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या शब्दाचा सन्मान नव्हे तर हा धर्मवीर संभाजीराजांचा सन्मान ठरेल. विचार करा ४० दिवस ... स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे केस काढले गेले, डोळयांमध्ये गरम लोखंडी सळया टाकल्या गेल्या ....

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार...

नखे तोडण्यात येतात, चामडी काढण्यात येते तरी छावा म्हणतो की, "किती ही अत्याचार कर मी धर्मांतर करणार नाही. माझा जीव गेला तरी चालेल." त्यांनाही खुर्चीवर प्रेम करता आले असते. सत्तेसाठी लाचार होता आले असते. छत्रपती संभाजी राजे यांना औरंगजेबाने सांगितले की, "माझ्या तीन अटी मान्य कर." त्यापैकी एक अट अशी होती की, "तुझे सर्व किल्ले दिले तर मी तुला दख्खन प्रदेशाचा प्रमुख करीन." छत्रपती संभाजी राजे म्हणाले, "अशा खुर्च्या मी आगीत भस्मसात करुन टाकीन." खुर्च्या व पदे आयुष्यभरासाठी नसतात. धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांचे नाव औरंगाबाद जिल्ह्याला देण्यात यावे. यापूर्वी आपण खूप नावे बदललेली आहेत. सन २०११ मध्ये "ओरिसा" चे नाव बदलून "ओडिसा" करण्यात आले, "पाण्डेचेरी" चे नाव बदलून "पुण्डीचेरी" केले. सन २०१५ मध्ये दिल्ली येथील "औरंगजेब मार्गाचे नाव बदलून ए.पी.जे.अब्दुल कलाम मार्ग असे केले आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी मध्यंतरी एक वक्तव्य केले होते की, नावे बदलल्याने काय होते ? याकरिता मी त्यांचा अभ्यास केला. त्यांनी त्यांचे नाव "विजय भाऊसाहेब थोरात" होते ते बदलून "बाळासाहेब भाऊसाहेब थोरात" असे का केले ?

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये संसदीय कार्य मंत्री महोदय व माननीय पर्यावरण मंत्री महोदय उपस्थित आहेत. माननीय पर्यावरण मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांनी औरंगाबाद जिल्ह्याचे नाव बदलण्याची घोषणा केली होती. आजचा दिवस छत्रपती संभाजी राजे यांना आदरांजली व्यक्त करण्याचा आहे. तिथी महत्त्वाची असते. सदरहू जिल्ह्याचे नाव बदलण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे. उक्त नस्तीची मागणी केली त्यावेळी मला त्या अधिकाऱ्याने नस्ती दिली नाही, मला त्रास दिला. मी उक्त नस्ती घेतल्यानंतर मला आश्चर्य वाटते. हा विषय मी काल व परवा देखील उपस्थित करु शकत होतो. आज धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांचे स्मरण करीत सदरहू जिल्ह्याचे

श्री.सुधीर मुनगंटीवार...

नामकरण करुन मंत्री महोदयांनी रोषनाई केली नाही तर लक्षात ठेवावे. दुर्जन लोकांची दुर्जनता काही वर्षे नक्की चालते. परंतु सज्जन शक्ती एक वेळा जागी झाली तर इतिहासात....

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य यांनी आपणे भाषण पूर्ण करावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, आपण निर्देश द्यावेत, ही माझी विनंती आहे. आजच्या दिवसाच्या निमित्ताने या नामकरणाच्या संदर्भात माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे किंवा ॲड.अनिल परब यांच्यापैकी ज्यांना घोषणा करावयाची असेल त्यांनी ती करावी. या प्रकरणीच्या प्रस्तावास ताबडतोब मान्यता देण्यात यावी. "औरंगाबाद" जिल्ह्याचे नाव "संभाजीनगर" असे बदलण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा आज निर्णय घेतला तर इतिहास आपले नाव नेहमी सुर्यासारखे तळपत ठेवील अन्यथा अंधार झाल्याशिवाय राहणार नाही.

-----------

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

अप्रकाशित प्रत

**पृ.शी./ मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

श्री.संजय बनसोडे (इतर मागास बहूजन कल्याण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित (मुख्य कंपनी) व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ (उप कंपनी) यांचा एकत्रित वार्षिक अहवाल तसेच मुख्य कंपनी व उप कंपनीचे सन २०१८-१९ चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला. सदरहू अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**उपाध्यक्ष** : आज शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी स्थगन प्रस्तावांच्या एकूण ३ सूचना प्राप्त झाल्या आहेत. परंतु आज राज्याचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहात सादर होणार असल्यामुळे प्रथेनुसार स्थगन प्रस्ताव घेतले जात नाहीत. यासर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना अनुमती नाकारली आहे.

--------

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

## वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्या श्रीमती सरोज अहिरे यांचा आज जन्मदिन आहे. मी सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिष्टचिंतन करतो.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** राज्यातील अनेक आदिवासी जमिनींचे बिगर आदिवासींना झालेले हस्तांतरण

**मु.शी.:** राज्यातील अनेक आदिवासी जमिनींचे बिगर आदिवासींना झालेले हस्तांतरण या संबंधी डॉ.किरण लहामटे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ.किरण लहामटे (अकोले) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"आदिवासी जमीन हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र महसूल अधिनियम कलम ३६ व ३६ अ नुसार निर्बंध घालण्यांत येणे, त्यामुळे एखाद्या आदिवासी भोगवटा जमीन धारकाला अन्य आदिवासी व्यक्तींला जमीन विकायची असेल तर कलम ३६ (२) नुसार जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक असणे व एखाद्या आदिवासी भोगवटा जमीन धारकाला बिगर आदिवासीला जमीन हस्तांतरण करायची असेल तर कलम ३६ (अ) नुसार राज्य शासनाची परवानगी घेण्याची कायद्यांतर्गत तरतूद केलेली असणे, तथापि पेसा कायद्यातील वरील तरतुदीच्या अनुषंगाने जमीन महसूल संहिताच्या कलम ३६ अ मध्ये सुधारणा अनिवार्य असल्याने मा.राज्यपाल महोदयांनी पाचव्या अनुसूचीतील परिच्छेद ५ (१) च्या अधिकारात दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या अधिसूचनेव्दारे कलम ३६ अ च्या पहिल्या परंतुकानंतर कलम ३६ अ (१) परंतुक दुसरेमध्ये "राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील गावांमध्ये ग्रामसभेची मंजुरी मिळाल्याशिवाय आदिवासी व्यक्तींचा भोगवटा बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरित करण्यास जिल्हाधिकारी यांनी मंजुरी देऊ नये" अशी सुधारणा करुन त्याप्रमाणे तरतूद केलेली असणे, तथापि अशा तरतुदी असल्या तरी राज्यात अनेक आदिवासी जमिनींचे बिगर आदिवासींना हस्तांतरण झालेले असणे, त्यामुळे बनावट

डॉ.किरण लहामटे.......

कागदपत्रे तयार करुन जमिनी खरेदी करण्यांत आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी अशाप्रकारे बेकायदेशीर हस्तांतरण झालेल्या जमिनी पुन्हा आदिवासींना प्रत्यार्पित करण्यासाठी तसेच असे कृत्य करणाऱ्यांवर व यामधील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, परंतु त्याप्रकरणी कारवाई करण्यांत न येणे, परिणामी राज्यातील आदिवासी समाजांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितर◌ीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

डॉ.किरण लहामटे : अध्यक्ष महोदय, मला माझी लक्षवेधी सूचना मांडण्यासाठी सुरक्षा देण्यात यावी. विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांना आपापल्या जागेवर बसण्याची सूचना करावी, अशी मी विनंती करतो.

**उपाध्यक्ष :** विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपण आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

डॉ.किरण लहामटे : अध्यक्ष महोदय, आदिवासी जमीन हस्तांतरणाबाबत कायदा तयार करण्यात आलेला आहे. उक्त कायद्यानुसारच आदिवासींची जमीन खरेदी करता येते. परंतु.....

डॉ.किरण लहामटे : अध्यक्ष महोदय, छत्रपती संभाजी महाराज यांच्या घोषणेबरोबर आदिवासी समाजाचे प्रश्न देखील गंभार्याने घेण्यात यावे, अशी मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करीत आहे.

**उपाध्यक्ष :** सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. आज दुपारी २.०० वाजता राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे दुपारी २.०० वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपण आपल्या जागेवर जाऊन बसावे.

डॉ.किरण लहामटे : अध्यक्ष महोदय, आदिवासी जमिनी खरेदी करताना कोणत्याही प्रकारचे नियम पाळले जात नाहीत. आदिवासी समाजाच्या परिस्थितीचा व त्यांच्या अज्ञानपणाचा गैर फायदा घेऊन राज्यामध्ये सर्वत्र आदिवासी समाजाच्या जमिनी हडपण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे मी माननीय महसूल मंत्री, महाराष्ट्र सरकारसह या सभागृहाचे लक्ष माझ्या लक्षवेधी सुचनेकडे वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, माझे स्पेसिफिक फक्त तीन प्रश्न आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, या राज्यामध्ये किती आदिवासी जमिनीचे खरेदी व्यवहार झालेले आहेत, याबाबतची तालुकानिहाय चौकशी करण्यात आली आहे काय? चौकशी केली असेल तर आदिवासी जमिनीच्या खरेदीचे किती व्यवहार झालेले आहेत?

डॉ.किरण लहामटे.......

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, गैर व्यवहारातून खरेदी केलेल्या आदिवासींच्या किती जमिनी संबंधित आदिवासी बांधवाना परत केलेल्या आहेत? जर केल्या नसतील तर त्या किती दिवसांपर्यंत परत करणार आहात?

अध्यक्ष महोदय, माझा तिसरा प्रश्न असा आहे की, बोगस कागदपत्रांच्या आधारे आदिवासी समाजाच्या जमिनी बिगर आदिवासी लोकांनी घेतलेल्या आहेत. त्या संबंधित अधिकारी व जमीन खरेदीदारावर फौजदारी गुन्हे दाखल करणार आहात काय?

श्री.बाळासाहेब थोरात : आदिवासीची जमीन आदिवासींना देण्याचा अधिकारी जिल्हाधिकारी यांचा आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उपाध्यक्ष :** आदिवासींच्या जमिनीसंदर्भातील लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये मांडण्यात आलेली आहे. त्यावर मंत्री महोदय उत्तर देत आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. सन्माननीय सदस्य डॉ.किरण लहामटे हे आदिवासी समाजाचा प्रश्न अतिशय पोटतिडकीने मांडत आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी जागेवर जाऊन बसावे, अशी मी विनंती करीत आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांच्या मते आदिवासीच्या जमिनी चुकीच्या पद्धतीने खरेदी केलेल्या आहेत. अशा प्रकारे चुकीच्या पद्धतीने जमिनी खरेदी केल्या असतील तर त्याबाबतची तशी तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे प्राप्त होते. त्यानंतर त्यांच्याच स्तरावर उक्त तक्रारीची तपासणी केली जाते. त्यामध्ये काही दोष आढळून आला तर त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते. उक्त लक्षवेधी सुचनेच्या अनुषंगाने आपण कोणताही स्पेसिफिक प्रश्न विचारलेला नाही. त्यामुळे मी स्पेसिफिक उत्तर देऊ शकत नाही.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब थोरात ....

परंतु मी सांगू इच्छितो की, याबाबत स्पेसिफिक तक्रार असेल तर त्याकडे निश्चितपणे लक्ष दिले जाईल आणि कार्यवाही केली जाईल.

श्रीमती मंजुळा गावित : अध्यक्ष महोदय, आदिवासी जमीन हस्तांतरण या विषयावर बोलण्यासाठी मी उभी आहे. सार्वजनिक प्रयोजनार्थ होणारी कोणतीही योजना किंवा सातबारा उतारा विभागाच्या नावे होत नाही, तोपर्यंत कामे होऊ नयेत. माझ्या मतदारसंघामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र, वसरावळ आहे. या आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम २० ते २५ वर्षापूर्वी झाले आहे. परंतु सातबारा उताऱ्यावर नोंदी नसल्यामुळे या आरोग्य केंद्राची कामे थांबलेली आहेत. तेथील जागा आदिवासी बांधवांची असून त्या आदिवासी बांधवांना त्या जागेचा मोबदला मिळाला नाही. आदिवासी व्यक्तींनी आदिवासी व्यक्तींना घरे बांधण्यासाठी स्टॅम्प पेपरद्वारे जागा दिल्या आहेत. त्या लोकांनी घरेही बांधलेली आहेत. गाव, पाडे, वस्ती येथील घरे नियमित करण्यासाठी अनेक अडचणी येत आहे. याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय ? आदिवासींच्या जमिनी आज बिगर आदिवासी लोकांच्या सातबारा उताऱ्यावर आहेत. या जमिनींची शासनाने तपासणी करणे आवश्यक आहे. याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय ? आदिवासींच्या जमिनीवर बिगर आदिवासींनी बांधलेली घरे तात्काळ काढून टाकणे किंवा तपासून घेणे आवश्यक आहे. याबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंजुळा गावित यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. पहिल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, त्याबाबत तपासणी करण्यात येईल आणि योग्य तो मार्ग काढला जाईल. तसेच आदिवासी लोकांच्या जागेवर काही घरे बांधली असतील आणि त्याबाबत स्पेसिफिक तक्रार असेल तर त्यावर निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : अध्यक्ष महोदय, राज्यात किती आदिवासी लोकांच्या जागेचा बेकायदेशीर फेरफार झाला आहे ? किती लोकांनी अवैधरित्या जागेची विक्री केली आहे ? याची माहिती मंत्री महोदयांनी पटलावर ठेवावी. मी सांगू

श्री. धर्मरावबाबा आत्राम ......

इच्छितो की, अशा प्रकारचा गैरव्यवहार मोठ्या प्रमाणात होत आहे. हे थांबले पाहिजे. यादृष्टीने मंत्री महोदय काही निर्णय घेणार आहेत काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, अशा तक्रारी असतील तर त्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविल्या जातात आणि ती तक्रार पडताळून घेतली जाते. त्या स्तरावर याबाबत निर्णय घेतला जातो. मला वाटते की, या विषयाच्या अनुषंगाने काही स्पेसिफिक तक्रार असेल तर ती सांगावी. त्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री. चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, जातीच्या परिभाषेत बोलण्याचे माझ्यावर संस्कार नाहीत आणि मला ते आवडतही नाही. परंतु ते बोलल्याशिवाय हा विषय स्पष्ट लक्षात येणार नाही. आदिवासी समाजाच्या महत्त्वाच्या विषयाची ही लक्षवेधी सूचना आहे. संभाजी महाराजांचे नाव औरंगाबाद शहरास देण्याची आमची महत्त्वाची लक्षवेधी सूचना आहे. ती पुढे चर्चेला येईल. माननीय अध्यक्ष हे आदिवासी नेते आहेत. आदिवासींची जमीन बिगर आदिवासींना देता येत नाही, असा कायदा आहे. ती जर द्यावयाची असेल तर त्यासाठी ग्रामसभेचा ठराव लागतो. हा ठराव नंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे जात असतो. जिल्हाधिकारी हे त्या जागेचा लिलाव करीत असतात. ती जमीन बिगर आदिवासींना द्यावयाची असेल तर आदिवासींना त्या जमिनीची अधिक किंमत मिळेल. त्यांची लूट होऊ नये. हे यामागील कारण आहे.

अध्यक्ष महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारत आहे. या विषयाच्या अनुषंगाने मी माननीय न्यायालयात याचिका दाखल करणार आहे. महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यापासून आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना देण्याची किती प्रकरणे या सरकारने मान्य केली आहेत ?

यानंतर श्री. चौधरी....

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत दादा पाटील हे स्वत: राज्याच्या महसूल मंत्री पदी होते. त्यामुळे साहजिकच त्यांनी हे विषय हाताळलेले आहेत व त्यांना या सर्व बाबी माहिती आहेत. माझ्याकडे मागील सरकारच्या कार्यकाळातील ५ वर्षांची आकडेवारी देखील आहे. सन २०१५ ते २०१९ दरम्यान आदिवासी जमिनींचे बिगर आदिवासींना हस्तांतरण केल्याची २४० प्रकरणे मंजूर झाली. मी महसूल मंत्री असताना आदिवासी जनकल्याण समितीच्या शिफारशीने आदिवासी जमिनींची विक्री थांबविली होती. परंतु मोठया प्रमाणात ही प्रकरणे न्यायालयात गेली. त्या अनुषंगाने न्यायालयाने काही आदेश पारित केले. न्यायालयाचा अवमान झाल्याच्या देखील काही केसेस दाखल झाल्या होत्या.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत दादा पाटील महसूल मंत्री असताना सन २०१५ ते २०१९ दरम्यान अशी २४० प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच सन २०१९ ते २०२१ पर्यंत १६९ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

श्री.चंद्रकांत दादा पाटील : अध्यक्ष महोदय, आदिवासी खासदार आणि आमदारांची यासंदर्भात एक समिती आहे. या समितीकडे वेगवेगळया मागण्या आल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी अनेक वेळा बैठक बोलावली होती. आपण देखील सदर बैठकीला उपस्थित असायचे. त्या बैठकांमध्ये हा विषय प्रत्येक वेळी अमान्य करण्यात आला आहे. माझा प्रश्न असा आहे की, या सरकारच्या काळात आमदार-खासदारांची बैठक झाली आहे का ? कारण त्या बैठकीला देखील घटनात्मक दर्जा आहे. जर बैठक झाली असेल तर त्यामध्ये हस्तांतरणास मान्यता देण्यात आली आहे का ?

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, आमदार-खासदारांची कोणतीही बैठक झालेली नाही.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, २०१५ ते २०१९ दरम्यान २४० प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच आताच्या दोन वर्षांमध्ये त्यांनी ट्वेंटी-ट्वेंटी मॅच खेळून १६९ प्रकरणे निकाली काढली.

ॲड.आशिष शेलार.....

अध्यक्ष महोदय, उत्तराच्या निवेदनामध्ये मंत्री महोदयांनी नमूद केलेले आहे की, "शासन स्तरावर प्रस्तावा संदर्भात छाननीअंती गुणवत्तेवर पूर्व परवानगी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येतो." यातील 'छाननीअंती' आणि 'गुणवत्तेवर' या दोन शब्दांमध्येच खरी मेख आहे.

अध्यक्ष महोदय, हा एक मोठा घोटाळा आहे. राज्यातील आदिवासींना आपल्या जमिनींपासून वंचित करण्याचा हा घोटाळा आहे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत दादा पाटील यांनी सर्व बाबी विस्ताराने मांडल्या आहेत. ग्रामसभेची पूर्व परवानगी, लिलाव, आमदारांची बैठक याबाबत उत्तर देण्याऐवजी कायदा हे सांगतो, कायदा ते सांगतो, कायद्यानुसार जमीन परत घेता येते हे मंत्री महोदयांनी नमूद केले आहे. मंत्री महोदयांना माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, सदर १६९ प्रकरणांपैकी ता.वाडा, जि.पालघर येथील किती प्रकरणे आहेत ? केवळ दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये वाडा, जि.पालघर येथे १६९ पैकी सर्वात जास्त प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. त्यानुसार बिगर आदिवासींना आदिवासींची जागा विकली गेली आहे.

अध्यक्ष महोदय, त्या ठिकाणी मोठा ले-आऊट मंजूर करुन घेण्यासाठी पंधरा-वीस लोकांनी या जमिनी आदिवासींकडून हस्तांतरित करुन घेतल्या आहेत, हा माझा आरोप आहे. या आरोपाबाबत आपण चौकशी करणार का ?

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासीला देण्याची एक प्रक्रिया आहे आणि ती एम.एल.आर.सी. कायद्यानुसार आहे. त्या कायद्यानुसार त्याची प्रक्रिया पूर्णपणे फॉलो केल्यानंतरच शेवटी निर्णय होत असतो. अशा प्रकारचे निर्णय सन २०१५ ते २०१९ या कालावधीत सुध्दा झालेले आहेत. आज वाडा या क्षेत्रातील प्रत्येक प्रकरणाची सविस्तर माहिती माझ्याजवळ नाही. त्यामुळे आता मी काही सांगू शकत नाही.

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मला आपले संरक्षण हवे आहे. आपण स्वत: त्या मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करता. मंत्री महोदय येथे उपस्थित आहेत. ती गॅलरी इनव्हीजीबल असेल. पण अधिकारी येथे आहेत. हा प्रश्न विचारल्यानंतर मंत्र्यांना नोट देऊ शकत नाहीत काय ? पालघर जिल्ह्यातील वाडा या एका तालुक्यामध्ये १६९ पैकी सर्वाधिक प्रकरणे होत असतील तर आणि मंत्री महोदय त्याला मला ते माहिती नाही, असे उत्तर देत असतील तर.... आपण निदान माहिती घेतो आणि चौकशी करतो असे तरी उत्तर दिले पाहिजे. आपण असे ब्लॅन्केट प्रोटेक्शन देऊ नका. तुमच्याही मनात ते नाही. याबाबत आमचाही भरवसा आहे. वाड्यामध्ये एक मोठा ले-आऊट मंजूर करण्यासाठी हे सर्व प्रकरण चालू आहे. This is nothing but a land scam. आपण त्याची चौकशी करा.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, मी ती माहिती घेतो. परंतु आता मला जी माहिती मिळाली आहे त्यानुसार वाडा तालुक्यात असे प्रकरण नाही.

प्रा. डॉ. अशोक उईके : अध्यक्ष महोदय, आदिवासी कुटुंब आणि आदिवासी बांधवांचे हित जोपासण्यासाठी एप्रिल १९५७ ते ६ जुलै १९७४ च्या दरम्यान जे व्यवहार झालेले आहेत त्या व्यवहारांच्या अधिन राहून अनेक जिल्ह्यांमधील जिल्हाधिकारी यांच्याकडे जी प्रकरणे प्रलंबित आहेत त्या प्रकरणांचा कधीपर्यंत निपटारा करणार आहात. दुसरा विषय असा आहे की, १९७४ नंतर आदिवासींची जमीन गैरआदिवासींना विकावयाची असेल तर रकाना ७ मध्ये २ प्रकारचे शिक्के

प्रा. डॉ. अशोक उईके...

मारले जात होते. एक म्हणजे कलम ३६ (१) आणि दुसरे कलम ३६ (२). आदिवासींची जमीन आदिवासींनाच विकायची असेल तर कलम ३६ (१) अनुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परवानगी घेऊन जमीन विकता येते. परंतु ३६ (२) नुसार आदिवासींची जमीन गैरआदिवासीला विकायची असेल तर सर्व प्रक्रिया पूर्ण करुन महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव येऊन परवानगी घ्यावी लागते. परंतु हा विषय जमिनीच्या विक्रीच्या बाबतीत आहे. परंतु आदिवासीच्या जमिनीवर एन.ए. झाला असेल तर ती एन.ए. असलेली जमीन विकण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागते काय, हा माझा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, पहिला प्रश्न असा होता की, जिल्हाधिकारी यांच्याकडे १९५७ ते १९७४ या कालावधीत आदिवासी ते गैरआदिवासी अशा जमिनीच्या विक्री झालेल्या व्यवहारासंबंधी जी प्रकरणे प्रलंबित असतील ती प्रकरणे किती दिवसात निपटारा केले जातील. दुसरे म्हणजे १९७४ नंतर शासनाची परवानगी घ्यावी लागते. त्यानुसार आदिवासी जमिनीवर जर एन.ए. झाला असेल तर ती एन.ए. झालेली जमीन विक्रीसाठी शासनाची परवानगी लागते काय, या माझ्या २ स्पेसिफिक प्रश्नांचे मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे, अशी त्यांना विवनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन १९७४ पर्यंत आदिवासी जमीन बिगर आदिवासीला हस्तांतरित झाली असेल तर त्याबाबत आपण वेळोवेळी निर्णय घेतले आहेत. त्यानुसार जर त्या जमिनीचा वापर सुरु झाला नसेल तर ती जमीन पुन्हा आदिवासीला परत करावी, असा तो निर्णय आहे आणि आपल्या त्याबाबतचा अभ्यास असल्याचे दिसते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारल्यानुसार संपूर्ण महाराष्ट्रातील असे व्यवहार तपासत बसणे सोपे नाही. आपण १९७४ पूर्वी जे नियमानुसार हस्तांतरण झाले असेल त्यासंबंधी काही बोलता येणार नाही. परंतु आपण एखाद्या

श्री. बाळासाहेब थोरात...

स्पेसिफिक प्रकरणात काही दोष असतील तर ते आपण आमच्या जरुर निदर्शनास आणावेत. शासनाच्या वेळोवेळच्या निर्णयात असेही म्हटले आहे की, १९७४ नंतर बिगर शेतीची जमीन घेतली असेल आणि त्याचा जर वापर केला नसेल तर ती देखील मूळ आदिवासीला परत करावी, असा निर्णय झालेला आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी एखादे स्पेसिफिक प्रकरण दिले तर शासन त्यामध्ये नक्की चौकशी करेल.

प्रा. डॉ. अशोक उईके : अध्यक्ष महोदय, आदिवासींच्या जमिनीवर जर एन.ए. झाला असेल तर ती जमीन विकण्यासाठी शासनाकडून परवानगी घ्यावी लागते काय?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, एन.ए.च्या बाबतीत सुध्दा परवानगी घ्यावीच लागते.

प्रा. डॉ. अशोक उईके : अध्यक्ष महोदय, जर अशा पध्दतीने शासनाची परवानगी घ्यावी लागत असेल आणि जर काही परवानगी न घेतलेली प्रकरणे आढळली तर आपण त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अशी असलेली प्रकरणे शासनाकडे द्यावीत. शासन ती प्रकरणे तपासून कारवाई करेल.

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना सन्माननीय सदस्यांनी २ स्पेसिफिक प्रश्न विचारले आहेत की, राज्यात महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यापासून गेल्या २ वर्षात किती जमिनीचे हस्तांतरण झाले. मंत्री महोदय, सन २०१५ ते २०२१ या कालावधीतील माहिती देतात. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, महाविकास आघाडी सरकार हे सन २०१५ पासून नाही तर गेल्या २ वर्षापासून आले आहे. त्यामुळे या २ वर्षाच्या काळात अशा किती जमिनींचे हस्तांतरण झाले त्याचे उत्तर मंत्री महोदयांकडून मिळत नाही.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय शिरसाट)**

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

माझा दुसरा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारची सर्वात जास्त प्रकरणे ही पालघर जिल्ह्यामध्ये झाली आहेत. वाडा तालुक्यामध्ये तर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर जमीन हस्तांतर झाले आहे. याची संपूर्ण यादी आमच्याकडे आहे. ज्या पद्धतीने जमीन हस्तांतरणाचा मोठा भ्रष्टाचार झाला आहे. त्यामध्ये आदिवासी जमिनी बिगर आदिवासींना हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत. या दोन वर्षामध्ये आपण किती जमिनींची प्रकरणे हस्तांतरीत केली आहेत ? दुसरे असे की, वाडा तालुक्यात याबाबतीत मोठा ले-आऊट करण्यात आला त्यामध्ये किती लोकांचा सहभाग आहे ? आदिवासी लोकांच्या जमिनी बिगर आदिवासींना हस्तांतरित करताना जो मोठा घोटाळा झालेला आहे, याची आपण चौकशी करणार आहात काय ? असे माझे तीन प्रश्न आहेत.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, वाडाच्या प्रश्नाच्या बाबतीत मी यापूर्वीच सांगितले आहे. तिथे तसे काहीही झालेले नाही तरी देखील मी ते तपासून घेतो असे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, शेवटी हे एमएलआरसीच्या कायद्यातील कलम ३६ आणि ३६(अ) नुसार आपण हे हस्तांतर करीत असतो. जी प्रकरणे पुर्तता करुन येतात त्याची पूर्ण छाननी होऊनच निर्णय होत असतो. या दोन वर्षात आम्हीच हा निर्णय केला आहे असे नाही. कारण यापूर्वी सुद्धा असे निर्णय केलेले आहेत आणि आताही होत आहे. हे निर्णय पूर्णपणे काळजीपूर्वक घेण्यात आले आहेत.

श्री राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, दोन वर्षामध्ये किती प्रकरणे मंजूर केली आहेत याची माननीय मंत्र्यांनी माहिती द्यावी.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत(दादा) पाटील यांच्या प्रश्नाला मी उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी ते उत्तर ऐकले नसेल तर मी पुन्हा एकदा सांगतो की, सन २०१५ ते २०१९ या

श्री. बाळासाहेब थोरात...

काळात २४० प्रकरणे आणि सन २०२०-२१ या दोन वर्षात १६९ प्रकरणे मंजूर केली आहेत.

श्री. दिलीप बोरसे : अध्यक्ष महोदय, आदिवासींच्या जमिनी हस्तांतरण महसूल कायद्यांतर्गत जमीन खरेदी विक्री, कलम ३६ व ३६(अ) नुसार होते. याचा अधिकार आपण जिल्हाधिकारी आणि शासन स्तरावर दिला होता आणि त्याच्या व्यतिरिक्त पेसा अंतर्गत जो काही जमिनीचा व्यवहार होत असेल तर त्यासाठी ग्रामसभेचा ठराव घ्यावा लागतो. महोदय, मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, आमच्या ओटीएसपी अंतर्गत काही आदिवासी लोकांच्या जमिनी ग्रामसभेचा ठराव न घेता व कोणत्याही पद्धतीची प्रक्रिया न करता जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार त्या खरेदी होत असतात. त्यात प्रामुख्याने ओटीएसपी अंतर्गत ज्या आदिवासींच्या जमिनी घेतल्या जातात यावर आपण काही निर्बंध आणणार आहात काय ? खरेदी विक्रीच्या माध्यमातून ज्या ज्या बाबी झालेल्या असतील त्या रद्द करुन आपण संबंधीत अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, मी अत्यंत स्पष्टपणे सांगत आहे की, यासाठी एमएलआरसीचा कायदा आहे. सन २०१६ मध्ये माननीय राज्यपालांच्या आदेशाने निर्णय झाला की, यामध्ये ग्रामसभेचा ठराव घेण्यात यावा. त्यानंतर एकही प्रकरण बिगर ग्रामसभेच्या ठरावाशिवाय झालेले नाही, अशी माझी माहिती आहे. परंतु एखाद्या ठिकाणी चुकले आहे असे जर आपण स्पेसिफिकपणे सांगितले तर आम्ही तपासून घेऊन कारवाई करु.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, आदिवासींच्या जागेवर बिगर आदिवासींच्या जागेची खरेदी करुन मोठी लॅन्ड बँक उभी करण्याचे षडयंत्र पूर्ण महाराष्ट्रामध्ये सुरु आहे. खास करुन पालघर, ठाणे आणि नाशिक जिल्ह्यामध्ये ज्या ठिकाणी आदिवासींच्या जमिनी आहेत तिथे लॅन्ड बँक उभी करण्याचे काम सुरु आहे. यासाठी शासनाला माझी विनंती आहे की, महाराष्ट्र लँड रिव्हेन्यु ॲक्टचे कलम ३६ आणि कलम ३६(अ) त्यानुसार आदिवासी टू आदिवासी आणि आदिवासी टू बिगर

असुधारित प्रत

श्री. योगेश सागर.....

आदिवासी अशा जमिनीच्या खरेदी विक्रीमध्ये आपण त्यांना लँड सिलिंग म्हणजे बिगर आदिवासींना विकायची असेल तर तो गट यापेक्षा मोठा होता कामा नये आणि तो बिलकुल लागून असू नये असे आहे. त्याला लागून लँड बँक उभी केली जात असेल त्या संदर्भात शासन कायदा आणणार काय, हा माझा पहिला प्रश्न आहे. या प्रश्नाचे माननीय मंत्र्यांनी तपासून पाहू असे उत्तर न देता होय किंवा नाही असे उत्तर द्यावे.आदिवासींची जागा वाचवायची असेल तर त्यांना शासनाने दिलेले पट्टे जर जागा विकून परत आदिवासी पट्टयासाठी उभे राहणार असतील तर शासनाकडे कधीही लँन्ड निर्मिती होणार नाही.  It is not a productive thing.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री.योगेश सागर .....

आपण नियम ३६ ( ए) व नियम ३६ मध्ये लँड सिलींग नुसार, बिगर आदिवासी यांच्याकरिता रिस्ट्रीक्शनचा कायदा या सदनात आणणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, शहरे जशी वाढत गेली तशी आदिवासींची जमीन शहरांच्या जवळ आली, काही जमीन शहरात गेली ही वस्तुस्थिती आहे. यामुळे आदिवासी आपली जमीन विकतात किंवा ती विकसित करतात. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेला मुद्दा तपासून या बाबत निर्णय घेऊ.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

**तालिका सभाध्यक्ष ( संजय शिरसाट ) :** सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील आपण माईकवर बोलावे. आपल्याला संधी आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, मी माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांच्याकडून अपेक्षा करतो. त्यांना अजून बरेच राजकीय जीवन जगायचे आहे. या सर्व गोष्टींचा त्यांनी अभ्यास केला पाहिजे. आदिवासींच्या जमिनी मोठया प्रमाणात बिगर आदिवासींना दिल्या जात आहेत. ५ वर्षांमध्ये कोर्ट ऑर्डर झाल्याशिवाय एकही जमीन दिलेली नाही. ( अडथळा )

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील आपण आपले स्टेटमेंट द्यावे.

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, वारंवार आम्ही प्रश्न विचारत आहे. पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात मोठया प्रमाणात बिगर आदिवासींना आदिवासींच्या जमिनी सलग दिल्या जात आहेत. तेथे योजना आणली जात आहे. सर्व नियम धाब्यावर बसले जात आहेत. आपण आदिवासींना जमिनींपासून बेघर तर करतच आहोत. मात्र आता त्यांच्याकडे जमिनी नाही अशी स्थिती आणली जाणार आहे काय ? मी आपल्याला प्रश्न विचारतो. याचे समाधानकारक उत्तर मिळणार नाही हे मला माहीत आहे. या दोन वर्षात कोर्ट ऑर्डर देते त्यावेळी काही कारणाने द्यावे

श्री.चंद्रकांत पाटील ....

लागते. कोर्ट ऑर्डर शिवाय किती आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना ग्राम सभेचा ठराव न करता, जिल्हाधिकाऱ्यांनी ऑक्शन न करता दिल्या आहेत, याची यादी द्या. आपण असे सांगितले की, ते पटलावर ठेवतो.

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, एक लक्षात घ्यावे की, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी ज्या पद्धतीने जमिनी दिल्या होत्या त्याच पद्धतीने आम्ही निर्णय केले आहेत. वेगळे कोणतेही निर्णय नाहीत. कोणताही निर्णय बेकायदेशीर करण्यात आलेला नाही. त्यांच्या काळात केले तसेच आम्ही करीत आहोत.

------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत मोठया प्रमाणात झालेली अनियमितता

**मु. शी. :** यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत मोठया प्रमाणात झालेली अनियमितता या संबंधी सर्वश्री. नाना पटोले, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, श्री. विकास ठाकरे, कुमारी प्रणिती शिंदे, श्री. अमीन पटेल, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. जितेश अंतापूरकर, कुणाल पाटील, सुभाष धोटे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. नाना पटोले ( साकोली ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत मोठया प्रमाणात अनियमितता असून त्याबाबत रितसर अनेक तक्रारी होऊनही पोलिस अधिक्षक यवतमाळ हे गुन्हा दाखल करुन घेत नसल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सदर बँकेने व संचालक मंडळाने संगनमत करुन बनावट कर्ज दुसऱ्याच्या नांवे वाटप करणे, या बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पतीच्या नावे कोट्यावधीचे बनावट कर्ज वाटप केलेले असून ते सध्या बुडीत असणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक मंडळ व बँकेचे अधिकारी हे कर्जदारांचे मालमत्ता जप्त करुन या मालमत्तेचा कमी किंमतीत लिलाव करणे, सदरची बँक रिझर्व्ह बँकेची कोणतीही मार्गदर्शक तत्वे पाळत नसणे, १० वेगवेगळया कंपनीच्या नांवे २२७ कोटींचे कर्ज या बँकेने तारणाशिवाय मंजूर करणे, ते सध्या बुडीत असणे, सदरचे व्यवहार जिल्हा उपनिबंधक, सहकारी

श्री. नाना पटोले .....

संस्था, यवतमाळ व आरबीआयच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत असणे, हे प्रकरण सन २०१४ पासून सुरु असून बँक जुने दस्तऐवज नष्ट करीत असणे, या बँकेचे सदरील प्रकरण गंभीर असून या प्रकरणात शेकडो कोटींचा आर्थिक गैरव्यवहार झाला असणे, त्यामुळे संचालक मंडळ बरखास्त करुन येथील मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य दोषी अधिकारी यांच्यावर फौजदारी कारवाई व्हावी तसेच यामध्ये मोठा अपहार झाला असल्याने हे प्रकरण सखोल चौकशीसाठी सक्त वसूली संचालनालय (ईडी) कडे सोपविण्यात यावे अशी होत असलेली मागणी, परंतू यासंदर्भात कारवाई करण्यास शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी या बँकेच्या खातेदारांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

श्री. बाळासाहेब पाटील ( सहकार मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, उत्तरात मंत्री महोदयांनी सांगितले आहे की,सदर बँकेच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या लेखी परिक्षण अहवालात बँकेच्या कामकाजात गंभीर दोष व अनियमितता दिसून आली आहे. बँकेचे कलम ८९ अन्वये सादर केलेला अहवाल विचारात घेऊन सहकार आयुक्त यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी जिल्हा विशेष लेखा परिक्षण सहकारी संस्था वर्ग १, यवतमाळ यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पतीच्या नावे झालेले कर्जवाटप, पुरेशा तारणाशिवाय रु.२२७ कोटींचे कर्जवाटप, चुकीच्या पद्धतीने ओटीएस योजना राबवणे, कर्ज वसुलीसाठी ठोस कार्यवाही न करणे इ. मुद्यांचा समावेश करण्यात आला आहे. हा चौकशी अहवाल आहे. मंत्री महोदयांनी उत्तरात २ महिन्यात चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत असे सांगितले आहे. हे सर्व दोष मान्य झाले आहेत. अशा बँकांमध्ये एक गोष्ट समोर आली की, अनेकांच्या नावाने कर्ज उचलले गेले, जे त्यांना ते माहीतही नाही. जेव्हा त्यांची मालमत्ता जप्त करण्यास गेले तेव्हा त्यांना समजले की, आम्ही या बँकेतून कर्ज घेतले आहे. जेव्हा आरडाओरड झाली, पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्ट गेला तेव्हा परस्पर ते पैसे भरण्यात आले. अशाही तक्रारी याबँकेत,पतसंस्थेत पहायला मिळाल्या आहेत. ही गंभीर बाब असतानाही त्यांना कोण पाठीशी घालत आहे ?

यानंतर श्रीमती गिरप...

अप्रकाशित प्रत

श्री.नाना पटोले ...

तेथील डीडीआर पाठीशी घालत आहे, की अजून कोण पाठीमागे घालत आहे? खरे तर तेथे प्रथम प्रशासक बसवून तातडीने चौकशी करण्याची व्यवस्था आपण करणार काय? आज त्या यवतमाळ जिल्ह्यामध्ये खूप भीती निर्माण झाली आहे. लोकांना समजतच नाही, बँक त्यांच्या नावावर परस्पर कर्ज लावत आहे. त्यामुळे त्या बँकेवर तातडीने प्रशासक बसवून, आपण चौकशी करणार काय?

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, ही जी बाबाजी दाते महिला सहकारी बँक आहे, तिचे कार्यक्षेत्र राज्यस्तरावर आहे. ही बँक निव्वळ महिलांची आहे. या बँकेमध्ये ५३६ कोटी रुपयांच्या ठेवी असून, कर्ज ३३६ कोटी रुपयांचे आहे. या बँकेचा ढोबळ एनपीए ६६ टक्क्यांच्याही पुढे होता. विशेषत: राज्यातील दि.३१.३.२०२० अखेरच्या ज्या तोट्यातील बँका आहेत, त्या बँकाची सहकार आयुक्तांमार्फत कलम ८९ अंतर्गत तपासणी केली. त्यामध्ये असे आढळून आले की, या बँकेमध्ये अनियमिता झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, त्याबाबतचा अहवाल सहकार आयुक्तांकडे प्राप्त झाला. शेवटी चौकशीची प्रक्रिया सुरु झाली. कलम ८१ अन्वये रितसर वैधानिक लेखा परीक्षा अहवाल प्राप्त झाला. दोन्ही अहवालांची छाननी करुन, कलम ८३ अन्वये चौकशीचे आदेश दि. १०.३.२०२२ रोजी देण्यात आले.

अध्यक्ष महोदय, एक गोष्ट खरी आहे की, बऱ्याचशा बँकांमध्ये असे घडते की, बोगस कर्जे उचलली जातात. मग लक्षात आल्यानंतर लोक ती कर्जे फेडतात. सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले सांगतात ते देखील असू शकते. ज्यावेळेस आपण तपास पूर्ण करु त्यानंतर या सर्व गोष्टी लक्षात येतील. कलम ८३ अन्वये जी चौकशी केली जात आहे, त्यामध्ये विशेषत: त्या बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी महिला आहेत, त्यांच्या पतीने मोठ्या प्रमाणात कर्जवाटप केले आहे. त्यांच्या नावाने झालेले कर्जवाटप आहे.

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील ...

अध्यक्ष महोदय, तसेच पुरेशा तारणाशिवाय २२७ कोटीचे कर्ज वाटप त्या ठिकाणी केलेले आहे. चुकीच्या पध्दतीने ओटीएसची स्कीम तेथे राबविलेली आहे. कर्जवसुलीसाठी तेथे कोणतीही ठोस कारवाई केली नाही. साधारणपणे हा अहवाल २ महिन्यांमध्ये सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर पुढची कारवाई केली जाईल.

श्री.सुभाष देशमुख : अध्यक्ष महोदय, त्या बँकेकडे ५३६ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत व DICGC ने आपल्याला जवळपास २५३ कोटी रुपये दिलेले आहेत. त्यापैकी २५२ कोटी रुपये वितरित केलेले आहेत. या बँकेचे १४ हजार खातेदार आहेत. ५ लाखांच्या पुढील जे कर्ज आहे, जे कर्ज आता DICGC देऊ शकणार नाही, त्यांच्या माध्यमातून त्यांना संरक्षण मिळू शकणार नाही. या ५ लाखांच्या पुढचे ठेवीदार किती आहेत, त्यांची रक्कम किती आहे, त्याची वसुली करुन देण्यासाठी आज आपल्याकडे ३३६ कोटी रुपयांचे कर्ज आहे. आपण सांगत आहात त्याप्रमाणे ते निनावी असेल, बोगस असेल जे काही असेल ते वसूल करुन या ठेवीदारांना आपण पैसे केव्हापर्यंत परत करणार?

अध्यक्ष महोदय, याला जोडून एक विषय आहे. राज्यातील अनेक ठेवीदार वेगवेगवळया सहकारी बँकामध्ये पैसे ठेवत असतील किंवा सहकारी पतसंस्थांमध्ये पैसे ठेवत असतील. एखादी बँक बुडाली तर, DICGC मार्फत ५ लाखांपर्यंतच्या ठेवींचे संरक्षण मिळते. मला असे वाटते की, आपण राज्यातील पतसंस्थातील ठेवीदारांना संरक्षण देण्यासाठी ठेव संरक्षण योजना जाहीर केली होती. त्याची नियमावली तयार करण्याचे अधिकार नियामक मंडळाला दिलेले आहेत. त्याची नियमावली तयार करुन या पतसंस्थेतील ठेवीदारांनासुध्दा १ लाख रुपयांपर्यंतच्या ठेवीचे संरक्षण तत्काळ सुरु करणार काय?

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, पतसंस्थेच्या बाबतीत नियामक मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. त्याची नियमावली करण्याचे काम आता अंतिम टप्प्यामध्ये आलेले आहे. त्यामध्ये पतसंस्था फेडरेशनच्या अनेक जणांच्या

श्री.बाळासाहेब पाटील ...

काही मागण्या आहेत, त्यांच्या सूचना आहेत. ते झाल्यानंतर पतसंस्थेबाबत निर्णय घेतला जाईल. या बँकेच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर, साधारणपणे आपण पाहिले तर, या बँकेची तरलता संपल्यामुळे रुपये ५ ... आपण जे निर्बंध लावले त्याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. त्या ठिकाणी DICGC कडून आपण पाहिले तर बँकेला २५३ कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. त्यातून एकंदर १४ हजार ठेवीदारांना ५ लाखापर्यंतचे वाटप केलेले आहे.

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील...

पाच लाख रुपयापर्यंत ठेवी असलेले दोन हजार ठेवीदार आहेत. त्यांच्यासाठी ७४ कोटी रकमेची मागणी डीआयसीजीसीकडून केली आहे. ही रक्कम लवकरच प्राप्त होईल. २,२०० ठेवीदारांच्या पाच लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी आहेत त्यांचे १७० कोटी रुपये देणे बाकी आहे. अलिकडील काळामध्ये मोठा प्रश्न समोर येत आहे की, अशा बँकांमध्ये पत संस्था आपल्या ठेवी ठेवतात. त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण राहत नाही. त्यामुळे पत संस्थेची रक्कम ४२ कोटी ३१ लाख रुपये एवढी रक्कम देणे बाकी आहे. ५ लाख रुपयांच्या वरील ठेवींसाठी डीआयसीजीसीकडून रक्कम आल्यानंतर बँकेची चौकशी सुरु आहे त्याच्या माध्यमातून संचालक मंडळावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याकडून ती वसूल करण्यात येईल. त्यानंतर पाच लाख रुपयांवरील ठेवीदारांची रक्कम देण्याची कार्यवाही केली जाईल.

अध्यक्ष महोदय, दुसरी माहिती अशी की, नागपूर नागरी सहकारी बँकेने त्यांना तत्काळ सामावून घेण्यात यावे, याकरिता आरबीआयकडे प्रस्ताव पाठवलेला आहे.

श्री.सुभाष धोटे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. पत संस्थांसाठी नियामक मंडळ आहे. बँकेसाठी Banking Regulation Act आहे. सदरहू बँकेच्या संदर्भात आरबीआयने सेक्शन ४९ व ३५ ए अंतर्गत कारवाई केली आहे. ती करीत असताना उक्त बँकेतील २५३ कोटी रुपयांच्या ठेवी ५ लाख रुपयांपर्यंतच्या १४ हजार ठेवीदारांना परत केल्या आहेत. उर्वरित ठेवी परत करण्यासाठी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही. डीडीआरने अहवाल पाठविल्यानंतर आयुक्त, सहकार यांनी त्यावर कारवाई केली. त्यानंतर स्वतंत्र लेखापरिक्षक लावण्याची आवश्यकता नव्हती. सदरहू बँकेवर सरकारने ताबडतोब प्रशासन नियुक्त केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देशमुख यांनी ५ लाख

श्री.सुभाष धोटे...

रुपयांपर्यंतच्या ठेवी सभासदांना देण्यात आल्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. मंत्री महोदयांनी मान्य केले आहे की, ज्या क्रेडीट सोसायट्यांनी बँकेत ५० लाख रुपये किंवा १ कोटी रुपयांच्या ठेवी ठेवल्या आहेत. त्यांना संरक्षण देण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, ५ लाख रुपयांपर्यंतच्या ज्यांच्या ठेवी आहेत त्या संबंधीत ठेवीदारांना मिळू शकतील. ५ लाख रुपयांवरील ठेवी ज्यांच्या आहेत त्यांना त्या संचालक मंडळाकडून वसूली केल्यानंतर परत द्याव्या लागतील. नागरी बँकेच्या संचालक मंडळाच्या बरखास्तीचे अधिकार आरबीआयला असल्याने यासंदर्भात त्यांचेकडे पाठपुरावा करण्यात येईल. लक्षवेधी सूचनेच्या आशयामध्ये दिसून येत आहे की, त्या कालावधीत तक्रारी केल्यानंतरही पोलिसांनी कारवाई केली नाही. आता सर्व चौकशी झाल्यानंतर संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, सदरहू बँकेने घोटाळा केला आहे, ही बाब मंत्री महोदयांना मान्य आहे. परंतु उक्त बँकेने ठेवीदारांचे पैसे पुढील कालावधीत गायब केले तर कोणती कारवाई करणार ? सदरहू प्रकरणी गुन्हा दाखल करुन कारवाई करावयास पाहिजे होती, ती न केल्याने यासंदर्भात कोणता राजकीय दबाव आहे काय, मंत्री महोदय बँकेला पाठीशी घालत आहेत काय, हे प्रश्न निर्माण होतात. बँकेवर प्रशासक बसविण्यासाठी कायदेशीर कार्यवाहीसाठी थोडा वेळ लागत असेल तर ठीक आहे. सदरहू बँकेतील ठेवीदारांचे पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत ? मुंबै बँकेप्रमाणे अनेक बँकेच्या संदर्भात अशा घटना घडतात. यासर्व गोष्टींना आळा बसविण्यासाठी संपूर्ण राज्यासाठी शासन कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना करणार आहे ?

असुधारित प्रत

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, ५ लाख रुपयांपर्यंतच्या २ हजार ठेवीदारांसाठी ७४ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. १७० कोटी रुपये रक्कम २,२०० ठेवीदारांची आहे. त्याबाबत मी यापूर्वीच सांगितले आहे की, संचालक मंडळावर जबाबदारी निश्चित केल्यानंतर त्यांच्याकडून ती रक्कम वसूल करण्यात येईल. बँक अडचणीत गेल्यानंतर पत संस्था व ठेवीदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. पूर्वी डीआयसीजीसीची मर्यादा १ लाख रुपये होती ती आता ५ लाख रुपये झाली आहे. अलिकडील काळात लोकांमध्ये जागरुकता आली आहे. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारची अडचण येऊ शकणार नाही.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.मदन येरावार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी अतिशय महत्त्वाची लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. महिलांच्या उत्थानासाठी व महिलांची स्वंतत्र बँक असावी, या उद्देशाने स्व.बाबाजी दाते यांनी बाबाजी दाते महिला सहकारी बँकेची स्थापना केली होती. परंतु असे म्हणतात की, प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे महिलेचा हात असतो. पण या बँकेमध्ये महिलांच्या अयशस्वीतेसाठी एका पुरुषाचा हात होता. त्या बँकेमध्ये एकच पुरुष हा मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत होता. विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पतीबाबत आपण माहिती दिलेली आहे. या सर्व बाबी लेखीस्वरुपात रेकॉर्डवर आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, पूर्वी इन्शोरन्सची मर्यादा ५० हजार इतकीच होती. परंतु माननीय श्री.नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळामध्ये त्यात वाढ करुन १ लाख रुपये करण्यात आली आहे. त्यानंतर ती मर्यादा १ लाखावरुन ५ लाख रुपयापर्यंत वाढविण्यात आली म्हणून आपण २०० ते २२५ कोटी रुपये ठेवीदारांना परत करु शकलो.

अध्यक्ष महोदय, ज्यांच्या ठेवी आहेत, त्यांच्या वसुलीसाठी काय अडचण आहे? जिल्हाधिकारी व डीडीआर यांच्यासोबत मी अनेक वेळा बैठका घेतलेल्या आहेत. सदर बँकेच्या अध्यक्षा त्यांच्यापुढे येऊन रडल्या. तरी देखील वसुली न करता त्यांची नावे बोर्डावर लावण्यात आली. त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची वसुली करण्यात आली नाही. त्यांच्यानावे प्लॉट आहेत. त्यांच्या नावावर करोडो रुपयांची मालमत्ता आहे. तरी देखील आपण त्यांच्याकडून वसुली का करीत नाही? सर्वसामान्य माणसांचे म्हणणे एवढेच आहे की, केंद्र सरकारच्या योजनेनुसार आपण ५ लाख रुपये दिले. परंतु ज्यांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे सदर पैशांचा उपभोग घेतला आहे, त्यांच्यावर कारवाई करुन सदर पैसे वसूल करणार आहात की प्रशासकाची नियुक्ती होईपर्यंत वाट पाहणार आहात?

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, उक्त बँकेचे नागपूर बँकेमध्ये विलीनीकरण करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ५ लाख रुपयांवरील रक्कम त्यांना देण्यात येईल. उक्त प्रकरणाची चौकशी पूर्ण

असुधारित प्रत

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील.......

झाल्यानंतर संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. त्यानंतर संबंधितांकडून उर्वरित पैशाची वसुली निश्चितपणे करण्यात येईल.

श्री.मदन येरावार : अध्यक्ष महोदय, नागपूर बँकेमध्ये सदर बँकेच्या विलीनीकरणाची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सदर प्रक्रिया थांबविण्यात यावी, असे आपल्याकडे लेखी स्वरुपामध्ये आहे काय?

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, सदर प्रक्रिया थांबविण्यात यावी, असे म्हटलेले नाही. परंतु सदर बँकेचे नागपूर बँकेमध्ये विलीनीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव आरबीआयकडे सादर केलेला आहे. राज्यातील कोणत्याही बँकेला किंवा सहकारी संस्थेला पाठीशी घालण्याचा राज्य शासनाचा कोणताही उद्देश नव्हता आणि तसा राहणार देखील नाही, एवढेच मी सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे उक्त बँकेमध्ये फक्त एकच पुरुष अधिकारी कार्यरत होते. बाकी सर्व अधिकारी/कर्मचारी महिलाच होत्या. परंतु नंतरच्या काळामध्ये त्या बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून एका महिलेची नियुक्ती करण्यात आली होती. आपले दुर्दैव असे की, त्यांच्या पतीने अनेक गैरव्यवहार केलेले आहेत. त्यामुळे बाबाजी दाते महिला सहकारी बँक अडचणीमध्ये आलेली आहे.

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी आताच सांगितले आहे की, संबंधित अधिकारी किंवा संचालक मंडळावर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली नाही. मला वाटते सदर जबाबदारी निश्चित करण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. तोपर्यंत संबंधित व्यक्तींने त्यांच्या नावे असलेली मालमत्ता दुसऱ्यांच्या नावे केली तर सदर पैशांची वसुली होणार नाही.

अध्यक्ष महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, संचालक आणि अधिकारी यांची स्थावर मिळकत किती रुपयांची आहे? माझा दुसरा प्रश्न असा आहे की,

श्री.प्रकाश सोळंके.......

संबंधित व्यक्तीची स्थावर मिळकत दुसऱ्याच्या नावे होऊ नये, यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे ?

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, संबंधित संचालकांची व अधिकाऱ्यांची मालमत्ता किती आहे, याबाबतची माहिती आता माझ्याकडे नाही. सदर माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल. तसेच सदर मालमत्ता दुसऱ्यांच्या नावे होऊ नये, यासाठी संबंधित महसूल विभागासह सर्व विभागाला तशा सूचना देण्यात येतील.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब पाटील .....

राज्य सरकारने भारतीय रिझर्व्ह बँकेला विलीनीकरणासाठी शिफारस केली आहे.

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, हा विषय अतिशय सोपा आहे. यात राजकारणाचा भाग नाही. ठेवीदारांच्या पैशाची सुरक्षितता, हा यातील महत्त्वाचा भाग आहे. नागपूर बँकेला जोडण्यात येणार आहे, असे सांगितले. परंतु तसे काहीही नाही. मंत्री महोदय गोलगोल उत्तर का देत आहेत, हे मला समजत नाही. ठेवीदारांच्या पैशाबाबत पोलीस विभागालाही कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत. कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल करता येतो. काहीवेळेस कर्ज घेतले नसले तरी कर्ज घेतल्याचे दाखविले जाते. ठेवीदारांच्या पैशांची उधळपट्टी चालू आहे. अशा वेळेस सहकार कायद्यानुसार कारवाई करावी. परंतु शासन म्हणून पोलिसांकडून तातडीने कारवाई करुन संचालक मंडळातील लोकांच्या मालमत्ता स्वीज करण्यात येणार आहेत काय व ठेवीदारांच्या पैशाकरिता सुरक्षितता उभी करण्यात येणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब पाटील : बँकेचे चाचणी लेखापरिक्षण करण्याचे आदेश देऊन या सर्व लोकांच्या विरुद्ध फौजदारी स्वरुपाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** शामनगर तलाव, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील जुना व नैसर्गिक मजास नाल्यावर कल्पतरु विकासकामार्फत अतिक्रमण करण्यात येत असल्याबाबत

**मु.शी. :** शामनगर तलाव, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील जुना व नैसर्गिक मजास नाल्यावर कल्पतरु विकासकामार्फत अतिक्रमण करण्यात येत असल्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर, वि.स.स यांनी दिलेली लक्षवेधी सचूना

श्री. रविंद्र वायकर (जोगेश्वरी (पूर्व)) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शामनगर तलाव, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील जुना व नैसर्गिक मजास नाला कल्पतरु विकासकामार्फत मातीने बुजवून व त्यावर पत्रे लावून अतिक्रमण करण्यात येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, तसेच मजास नाल्याच्या दुतर्फा असलेली संरक्षक भिंत दोन ठिकाणी अनधिकृतरित्या तोडून विकासाच्या नावाखाली मातीचे भराव टाकण्याचे काम बेकायदेशीररित्या करण्यात येत असणे, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील विविध भागातील मुख्य लोकवस्तींमधील पर्जन्यवृष्टीचे पाणी व सांडपाणी वाहून नेणारा मजास हा एकमेव मुख्य नाला असून तो अशाप्रकारे अतिक्रमण करुन बुजवल्यास आसपासचा संपूर्ण परिसर पावसाळ्यात पाण्याखाली येण्याची शक्यता असणे, तसेच मजास नाल्याचा प्रवाह बंद होऊन आजुबाजूच्या परिसरात दुर्गंधी निर्माण होऊन स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, तसेच सदर नाल्याची व आजुबाजूच्या परिस्थितीची पाहणी न करता या नाल्यावर ५ ठिकाणी पूल बांधण्याची परवानगी दिल्यामुळे हा नाला अधिकच अरुंद होणे, प्रस्तुत गंभीर प्रकरणी स्थानिक

श्री. रविंद्र वायकर .....

लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनाकडे लेखी तक्रारी दाखल करुनही याकडे जाणुनबुजून होत असलेले दुर्लक्ष, यात विकासकासोबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेही आर्थिक संगनमत असण्याची शक्यता, त्यामुळे या प्रकरणी महानगरपालिकेकडून कोणतीही कारवाई न होणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

श्री. प्राजक्त तनपुरे : (नगर विकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी सूचना अनेकांच्या आयुष्याशी संबंधीत आहे. दिनांक २६ जुलै, २००५ रोजी मुंबई शहरात प्रचंड प्रमाणात पाऊस पडला होता. तेव्हा संपूर्ण मुंबई जलमय झाली होती. तेव्हा दोन-दोन दिवस पाणी ओसरले नव्हते. त्यावेळेस मुंबई महानगरपालिकेला ब्रिमस्टॉवेडच्या माध्यमातून १९९१ साली दर ताशी २५ मि.मी. पाऊस पडला तर लोकांच्या घरामध्ये किती पाणी जाईल आणि दर ताशी ५० मि.मी. पाऊस पडला तर काय परिस्थिती उद्भवेल याबाबत सांगितले होते. त्यावेळेस सांगण्यात आले की, मुंबईतील नाले, गटारे स्ट्रॉम वॉटर ड्रेन केली पाहिजेत. याची प्रचिती आपणास सन २००५ ला आली. मुंबई शहरातील नाले रुंद झाले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मी मजास नाल्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. ब्रिमस्टोवॅडने हा मेजर म्हणजेच मोठा नाला आहे, हे घोषित केले आहे. एकीकडे जोगेश्वरी, आरे कॉलनी, शामनगर, मेघवाडी या भागातील संपूर्ण पाणी त्या नाल्यामध्ये येते. या नाल्याचा प्रवाह अतिशय मोठा आहे. जवळपास ३० ते १०० फुटापर्यंत तो वेगाने वाहतो. तो नाला नसून ती एक मोठी नदी आहे. या नदीच्या बाजूस शामनगर, टिळकवाडी, गांधीनगर, मेघवाडी हा भाग आहे. या भागाचा आकार बशीसारखा आहे. तेथे दरवर्षी पाणी साचते. यामुळे मुंबई महानगरपालिकेमार्फत कोट्यवधी रुपये खर्च करुन मेघवाडी येथे नाला बांधण्याचे हाती घेतले आहे. एका बाजुने त्याचे काम झालेले आहे. दुसऱ्या बाजूचे काम शिल्लक आहे. शामनगरच्या बाजूस, मजास नाल्याच्या शेजारी सन १९७० पासून डायनाक्राफ्ट कंपनी होती. ही कंपनी एका विकासकाने विकत घेतली. त्यानंतर त्या विकासकाला तेथे विकास करावयाचा होता. मी सांगू इच्छितो की, मला कोणाच्याही विकास कामामध्ये अडथळा आणावयाचा नाही. असा अडथळा आणण्याचे काहीही कारण नाही. परंतु तेथे विकास केल्यानंतर मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून एका विकासकाकरिता पाच पूल बांधण्यासाठी दिले गेले. पावसाळ्यात नाला साफ करण्यासाठी धोबीघाट येथून त्या नाल्यात पोर्कलेन मशिन उतरावावी लागते. तेथून हा संपूर्ण नाला स्वच्छ केला जातो. एका विकासकासाठी पाच पूल कशासाठी हवे आहेत ? तेथील लोकांचा यासाठी विरोध

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर .....

आहे. सन २०१४ मध्ये हे बांधकाम करण्यासाठी परवानगी दिली होती. परंतु लोकांच्या विरोधामुळे पूल बांधता आला नाही.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर.....

या विकासकाने तेथील लोकांचा येण्या-जाण्याचा रस्ता बंद केला. त्याच्या जागेवर त्याने पत्रे लावले तर हरकत नाही परंतु रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला वीस फुटांपर्यंत पत्रे लावण्यात आले.

अध्यक्ष महोदय, ये-जा करण्यासाठी ब्रिज बांधलाच पाहिजे व त्याला हरकत असण्याचे कारण नाही. परंतु पाच-पाच ब्रिज कशासाठी बांधले जात आहेत ? हा पर्यावरणाचा ऱ्हास व लोकांच्या जिविताशी खेळ नाही का ? मुंबई महानगरपालिकेने अशा प्रकारे परवानगी दिलीच कशी ? तसेच ब्रिमस्टोवॅड अहवाल विचारात घेताना सदर जागेची पाहणी करण्यात आली होती का ? माझा आरोप आहे की, पाहणी न करता विकासकाच्या संगनमताने ऑफिसमध्ये बसून पाच ब्रिज बनविण्यास परवानगी देण्यात आली, हा कोणता न्याय आहे ?

अध्यक्ष महोदय, या नाल्यावर ५ ठिकाणी ब्रिज बांधला जाणार असून अगोदर अस्तित्वात असलेला ब्रिज देखील मोठा करुन दिला जाणार आहे. नाल्याच्या संरक्षण भिंतीच्या बाजूला २५ फुटांचे पत्र्याचे शेड लावण्याकरिता कल्पतरु विकासकाने शासनाची अथवा मुंबई महानगरपालिकेची परवानगी घेतली होती काय असे विचारले असता "परवानगी घेतली आहे" असे सांगण्यात आले आहे. परंतु सदर परवानगी शासनाने अथवा मुंबई महानगरपालिकेने कधी व कशाच्या आधारे दिली ? अशी परवानगी देताना प्रत्यक्ष पाहणी केली होती का ? सदर परवानगी ही नियमाला बगल देऊन व बेकायदेशीररित्या देण्यात आली असल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणार का ? तसेच अशी कोणतीच परवानगी दिली नसल्यास विकासकाच्या अनधिकृत कामामुळे हजारो नागरिकांच्या जिवाला व आरोग्याला धोका निर्माण झाल्यामुळे संबंधित विकासकावर शासन दंडात्मक कारवाई करणार का व सदर विकासकाविरुध्द एफ.आय.आर. दाखल करणार का ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मजास नाल्याच्या संदर्भात सदर लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. या नाल्याच्या बाजूच्या कंपनी मालकाने तेथे त्या जागेवर रहिवासी ले-आऊट करण्याची परवानगी मागितली आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे.....

सदर नाल्याचे रुंदीकरण ब्रिमस्टोवॅड अहवालानुसार झालेले आहे. तसेच पावसाचे पाणी व्यवस्थित वाहून जावे यासाठी नाल्याच्या बाजुने भिंत देखील बांधलेली आहे. सन्माननीय सदस्यांची भावना आहे की, सदर नाल्याच्या वहन क्षमतेमध्ये अडथळा येता कामा नये. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, नाल्यावर बांधण्यात येणाऱ्या ५ ब्रिजेसमुळे नाल्याच्या वहन क्षमतेमध्ये कोणताही अडथळा येत नाही. तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मातीने नाला बुजवण्यात आला आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नसून काम सुरु असताना तेथे माती पडलेली होती. याबाबत महापालिकेला निर्देश देण्यात येतील की, काम करताना देखील पडणारे दगड-माती रोजच्या रोज उचलण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा आहे की, पाच कल्व्हर्ट कशासाठी बांधण्यात येणार आहेत ? महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार सदर ले-आऊटमध्ये दोन ॲमेनिटी स्पेसेस आहेत. सदर रिक्रिएशनल ग्राउंडवर जाण्यासाठी पाच पैकी दोन ब्रिजेस आहेत. तसेच या ले-आउटवर ७०० ते ८०० सदनिका बांधण्याचे उद्दिष्ट आहे. म्हणजेच सुमारे तीन ते चार हजार लोक तेथे राहतील. तसेच एका बाजूला झोपडपट्टी व दुसऱ्या बाजूला मुख्य रस्ता आहे. त्यामुळे या सर्व लोकांना मुख्य रस्त्यासाठी ॲक्सेस उपलब्ध करुन देण्यासाठी दोन ब्रिजेस आहेत. तसेच एक ब्रिज दोन इमारतींना जोडणारा आहे. महानगरपालिकेला विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, आवश्यक त्या सर्व प्रोसिजर फॉलो करुन व तेथील रहिवाशांची भविष्यातील गरज लक्षात घेऊन सदर परवानग्या देण्यात आल्या आहेत. म्हणजे आगीसारखी काही दुर्घटना घडल्यास एव्हॅक्युएशनसाठी रस्ते आवश्यक आहेत. एकूणच सर्व नियमांना धरुन सदर पाच ब्रिजेसच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे व यामध्ये काहीही अनधिकृत नसल्याचेही महापालिकेने सांगितले आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जो प्रश्न विचारला आहे तो त्यांनी पूर्ण माहितीच्या आधारावर विचारलेला आहे. कारण सन्माननीय सदस्य त्या भागामध्ये ५८ वर्षापासून राहतात. परंतु मंत्री महोदयांनी अतिशय शांतपणे आणि गुळगुळीत उत्तर दिले आहे. परंतु तोंडी दिलेले उत्तर आणि लेखी दिलेले उत्तर हे मंत्री महोदयांनी पुन्हा एकदा तपासण्याची गरज आहे. मंत्री महोदय म्हणतात की तेथे जे ५ ब्रिज बांधण्यात येणार आहेत ते लोकांच्या सोयीकरिता बांधण्यात येणार आहेत. परंतु आपण मंत्री महोदयांचे उत्तर बघितले तर आणि तेथील नगर भूमापन क्रमांक ३३, ५२ आणि ७६ पाहिला तर त्या ठिकाणी एक विकासक आलेला आहे. एक आर्किटेक्ट आलेला आहे आणि आर्किटेक्टने निवासी बांधकामासाठी एक आराखडा तयार करुन त्याची मंजुरी मागितलेली आहे. तेथे ५ ब्रिज बांधावे लागत आहेत ते बांधताना आपण विचार करा की तो किती मोठा ले-आऊट आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार तेथे सन २००५ मध्ये भयानक पाणी भरले होते. मंत्री महोदय आपल्या उत्तरातून सांगतात की त्या ठिकाणी ब्रिज बांधल्यामुळे पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. पिल्लरशिवाय ते ब्रिज बांधण्यात येत आहेत काय ? आपण जर तेथे कल्व्हर्ट बांधत असाल तर ब्रिज कशाला बांधता. पाणी नाल्याच्या वर आलेले असल्यामुळे आपण तो कल्व्हर्ट जमिनीपासून १० फूट उंच बांधणार नाहीत. त्यामुळे तेथील पाण्याचा निचरा होण्यासाठी ते ब्रिज अडथळे ठरणार आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरी गोष्ट अशी की, मंत्री महोदय असे म्हणाले की, त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा कचरा पडलेला नाही. पण आपल्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, आपण त्या ठिकाणी एक नवीन कल्व्हर्ट बांधण्याकरिता २०१४ साली परवानगी दिली होती आणि त्याला २०२२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. तो असा कसा कल्व्हर्ट आहे की ज्याला ८-८ वर्षे मुदतवाढ द्यावी लागते. त्यामुळे हे सर्व प्रकरण एकंदरीतपणे संशयास्पद आहे. हे पूर्णपणे बिल्डरला... म्हणजे ब्रिमशोवॅटच्या स्पेसिफिकेशनच्या प्रमाणात तेथे बांधलेली संरक्षण भिंत हलविण्याचे किंवा तोडफोड करण्याचे कारण काय आहे. आपण त्या नाल्याची रुंदी वाढविण्याकरिता करीत

श्री. भास्कर जाधव...

नाहीत. त्यामुळे असा संशय निर्माण होतो की, त्या बिल्डरचा ले-आऊट मंजूर होण्याकरिता जागेची कमतरता भासते आणि त्याला ते ले-आऊट मंजूर होण्याच्या दृष्टीने जागा उपलब्ध व्हावी, अशा सोयीकरिता हे प्रकरण दिसते. सन्माननीय सदस्य त्या भागातील रहिवाशी आहेत, लोकप्रतिनिधी आहेत, गेल्या ५८ वर्षापासून तेथे राहतात. म्हणून हे सर्व प्रकरण म्हणजे सन २०१४ पर्यंत दिलेली परवानगी २०२२ पर्यंत मुदतवाढ देणे, ५-५ ब्रिजेस बांधण्याचे काम तेथे झाले आहे. या प्रकरणी सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन आपण संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून त्यांचे समाधान झाल्यानंतरच या कामाला परवानगी द्याल काय, हा माझा प्रश्न आहे.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत आणि त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी सुध्दा जो काही मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, हे ५ ब्रिज नसून कल्व्हर्ट आहेत. एकाच मिळकतीमधून हा मोठा नाला जातो. या ठिकाणी महानगरपालिकेने बांधकामासाठी परवानगी दिलेली आहे. त्यामुळे तेथे कोणतेही अनधिकृत बांधकाम होत नाही. त्या ठिकाणी कल्व्हर्ट बांधत असताना मातीचा ढिगारा पडणे वगैरे असे घडू शकते. त्याबद्दलचे माझ्याकडे फोटोग्राप्स सुध्दा आहेत. त्यामुळे महानगरपालिकेने संबंधित विकासकाला सूचना दिली की, नाल्यामध्ये जी माती साचली आहे ती ताबडतोब काढून नाला स्वच्छ करा आणि त्यानंतर कल्व्हर्ट बांधा. या कामाला सन २०१४ मध्ये मंजुरी दिल्यानंतर या ५ कल्व्हर्टपैकी २ कल्व्हर्ट हे १८ मिटर डी.पी. रोडला जोडणार आहेत. २ कल्व्हर्ट हे आर.जी.ला जोडणार आहेत आणि १ कल्व्हर्ट हा नाला मधून गेल्यामुळे त्या ले-आऊटला जोडणारा आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. एकनाथ शिंदे....

त्यामुळे हे ब्रिज नाहीत. दुसरी बाब अशी आहे की, नाल्याचा प्रवाह कोठेही अडता कामा नये याची पुरेपुर खबरदारी घेऊन मुंबई महापालिकेने हे ५ कल्व्हर्ट बांधण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्याचबरोबर हे कुठेही अरुंद होता कामा नये यासाठी त्याला सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांना या विषयाबाबत जास्त माहिती आहे कारण ते स्टँडिंग समितीचे चेअरमन सुद्धा होते. पावसाळयामध्ये जेसीबी त्यातुन जाऊ शकते अशा प्रकारे कल्व्हर्ट तिथे बांधण्याची परवानगी मुंबई महापालिकेने विकासकाला दिलेली आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीमध्ये नाल्याचा प्रवाह थांबविणे किंवा नाल्याची रुंदी कमी करणे हे कधीही शक्य नाही. हा नाला ७.५ ते १० मीटर रुंद आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे योग्य आहे की, पावसाळयामध्ये या नाल्याच्या प्रवाहाला विरोध किंवा अडथळा होता कामा नये. याच्या सर्व अटी त्यामध्ये टाकलेल्या आहेत. त्याचबरोबर गाळ काढण्यासाठी किंवा त्याचे डिसील्टींग करण्यासाठी ॲप्रोचसाठी ६ मीटरचा रस्ता बांधायला सांगितले आहे. मोठ्या नाला एका छोटया नालाला येऊन मिळतो. तिथे ५ मीटरचा ॲक्सेस रोड बांधण्यासाठी अटीनुसार परवानगी दिलेली आहे. या सर्व अटी घालून हे ५ कल्व्हर्ट बांधण्यासाठी विकासकाला मुंबई महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे. या व्यतिरिक्त तिथे कोणत्याही परिस्थितीत वेगळे किंवा चुकीचे काम करता कामा नये. यासाठी मुंबई महापालिकेने प्रत्यक्ष पाहणी करुन अशा प्रकारची कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी विस्ताराने उत्तर दिलेले असून त्यांनी खात्री करुन घेतलेली आहे. माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी 'ब्रिजेस' असा उल्लेख केला त्यामुळे मी देखील 'ब्रिजेस' बोललो आहे. त्यापेक्षा मी कल्व्हर्टच बोलणार होतो. तो फक्त शब्दातील फरक आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर तसेच संबंधीत अधिकाऱ्यांना बोलावून आपल्या

श्री. भास्कर जाधव....

उपस्थितीत बैठक घेऊन त्यांचे समाधान होईपर्यंत आपण त्यांना सहकार्य करावे. कारण हा भागातील हा प्रश्न आहे.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, मी दिलेल्या लक्षवेधी सूचनेमध्येच असे दिले आहे की, " विकासकासोबत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेही आर्थिक संगणमत झाल्यामुळे हे होत आहे." परंतु तेथील लोकांची अडचण सांगितली जात नाही. त्यांनी सांगितल्याप्रमाणे माझे बालपण तिथे गेलेले असून मी ५८ वर्षे तिथे राहिलो आहे. दरवर्षी तिथे पाणी भरत आहे. ही जागा कॅप्चर करुन त्यांना पाहिजे तसा ले-आऊट करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे माझे दोन प्रश्न आहेत. एक म्हणजे, ५ कल्व्हर्टची परवानगी आपण रद्द करणार काय ? दुसरे असे की, माननीय पर्यावरण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत त्यांना मी सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे त्यासाठी त्यांनी स्टे देण्यात यावा, अशी मी त्यांना विनंती करतो. त्याच पद्धतीने ५ कल्व्हर्ट म्हणजे तो संपूर्ण नाला ते वापरणार आहेत. मुंबई महानगरपालिकेचा नाला असताना हे वापरणार आहेत. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आर्थिक संगणमत झालेले असल्यामुळे माननीय पर्यावरण मंत्र्यांनी याला स्टे द्यावा. तसेच संबंधीत माननीय मंत्र्यांनी याची परवानगी रद्द करावी अशी माझी मागणी आहे.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, मुंबई महापालिकेने सर्व बाबी तपासूनच या दिलेल्या परवानग्या दिल्या आहेत. ५ कल्व्हर्टपैकी २ कल्व्हर्ट हे १८ मीटरच्या डीपी रस्त्याला जोडणारे, २ कल्व्हर्ट आरजीला जोडणारे आणि १ कल्व्हर्ट हा एका ले-आऊटला जोडणारा आहे. या ठिकाणी जवळपास ३५०० ते ४००० लोकांची वस्ती असणार आहे. मी मघाशी म्हणालो की, यामध्ये नाल्याची रुंदी कमी होता कामा नये किंवा नाल्यातील पाण्याचा प्रवाह अडता कामा नये.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

श्री. एकनाथ शिंदे...

दर पावसाळ्यामध्ये तेथे जेसीबी गेली पाहिजे. जेसीबीद्वारे तेथे नाले सफाई झाली पाहिजे. या सर्व बाबी तपासून परवानग्या दिल्या आहेत. या शिवाय काही चुकीचे झाले असेल तर अधिकाऱ्यांनी ते तपासावे. सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत ते तपासावे. मुंबई महापालिकेने परवानगी दिलेली आहे. कोणी संगनमत केले असेल असे गृहीत धरुन स्थगिती देता येणार नाही.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. संजय शिरसाट ) :** आता सभागृहाची बैठक दुपारी २.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी १.१६ ते २.०० वाजेपर्यंत स्थगित झाली)

------

असुधारित प्रत

**( स्थगितीनंतर )**

**( अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष )**

**पृ. शी./मु. शी. :-** सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प सादर करणे

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

( वित्त मंत्र्यांचे भाषण )

( **प्रेस** : येथे उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री महोदयांचे भाषण जोडावे.)

............

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.अजित पवार......

** बैलाला आपण शेती आणि शेतकऱ्यांचे वैभव मानतो. कवी विठ्ठल वाघ यांच्या शब्दात सांगायचे झाले तर

"बैल घामाची प्रतिमा,
बैल श्रमाचे प्रतिक,
बैल माझ्या शिवारात,
काढी हिरवे स्वस्तिक"

(**प्रेस :** ** पान क्रमांक ६ वरील परिच्छेद क्रमांक २६ संपल्यानंतर वरील मजकूर छापावा व तद्नंतर उर्वरित भाषण सुरु... )

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. अजित पवार....

अर्थसंकल्पाचे वाचन सुरु.....

** अध्यक्ष महोदय, कोविडच्या काळात आपल्या सरकारने बजाविलेल्या कामगिरीचं देश-विदेशात कौतुक झालं... राज्यातल्या कोरोना योद्धयांनी जीवाची जोखीम पत्करुन सेवा दिली.

निष्ठेने केली सेवा,
ना केली कधी बढाई
दिला शब्द राज्याला,
की धैर्याने जिंकू लढाई....
लढाई लढतानाही....
विजयाची जागवली आशा,
देशानं पाहिलं अवघ्या....
आम्ही योग्य दाखविली दिशा....

( **प्रेस :** ** पान क्रमांक ७ वरील मुद्दा क्रमांक २९ मधील तिसऱ्या परिच्छेदानंतर वरील मजकूर छापावा व तद्नंतर उर्वरित भाषण सुरु.)

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

श्री.अजित पवार.....

अर्थसंकल्पाचे वाचन सुरु.....

**

"ज्ञान उजळले घरात माझ्या, घर झाले सोनेरी...

रस्ता नव्हता सोपा, हा पण होता गं काटेरी...

डगमगली ना कधी तरी ती, पुढे चालली बाई...

शिकविते देऊनी विश्व हातावर, सावित्रीआई..."

(**प्रेस :** ** पान क्रमांक ३१ वरील परिच्छेद क्रमांक १४४ संपल्यानंतर वरील मजकूर छापावा व तद्नंतर उर्वरित भाषण सुरु...)

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. अजित पवार...

** महाराष्ट्राच्या प्रबोधनाच्या चळवळीतील संत जगनाडे महाराजांचे स्थान आपल्याला चांगले माहिती आहे.

"आमुचा तो घाणा, त्रिगुण तीळाचा,
नंदी जोडियेला, मनपवनाचा,
भक्ती हो भावाची, लाट टाकियली,
शांतीशिळा ठेविली, विवेकावरी....."

असे म्हणणाऱ्या....

(**प्रेस :** ** पान क्रमांक ३१ वरील परिच्छेद क्रमांक १४७ संपल्यानंतर वरील मजकूर छापावा व तद्नंतर उर्वरित भाषण सुरू...)

श्री. अजित पवार....

** राज्याचे पहिले मुख्यमंत्री आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांची उद्या म्हणजे दिनांक १२ मार्च रोजी जयंती आहे. प्रसिद्ध गीतकार श्री. सुधीर मोघे हे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल म्हणाले होते की,

" तू नेता... योद्धा वीर राष्ट्रसंग्रामी,

तू राजधुरंदर, माणूस अंतर्यामी,

तू लेखक, वक्ता, रसिक स्वयंप्रज्ञेचा,

तू जणू प्राण, यशवंत महाराष्ट्राचा... "

या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून स्व. यशवंतराव चव्हाण यांना अपेक्षित असणारा आणि त्यांच्या स्वप्नातील प्रगत, पुरोगामी, समर्थ, बलशाली महाराष्ट्र घडविण्यास निश्चित मदत होईल असा मला विश्वास आहे. पुन्हा एकदा सर्व सन्माननीय सदस्यांचे तसेच राज्यातील तमाम बंधू-भगिनी, माता आणि तरुण मित्रांचे मी आभार मानतो आणि इथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र !

**(प्रेस** : ** अर्थसंकल्पिय भाषण भाग २ मधील पान क्र.३ वरील भाषण संपल्यानंतर वरीलप्रमाणे मजकूर छापण्यात यावा.)

**उपाध्यक्ष** : सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प सभागृहास सादर करण्यात आला.

अर्थसंकल्पीय प्रकाशनाचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे विधानभवनाकरिता आरक्षित असलेल्या वाहन पार्किंगच्या परिसरातील RT-PCR चाचणी केंद्र येथे करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी वितरण केंद्रावरुन सदर प्रकाशनाचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस प्राप्त करुन घ्याव्यात.

------

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष....**

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी ०३ वाजून १५ मिनिटांनी सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत